नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. १० जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# महाजन यांची हकालपट्टी करा

## काँग्रेस, ठाकरे गटाची मागणी... 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'वरील वक्तव्यावरून वादंग



मुंबई (स. गांवकरी)

सुवर्ण मंदिरातील ऑपरेशन ब्ल्यू स्टारला इतिहासातील काळा दिवस संबोधणारे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे हे वक्तव्य अत्यंत बेजाबदार, राष्ट्रहिताला बाधा आणणारे असून सैन्यदलाच्या शौर्याचा अवमान करणारे असून देशविरोधी भूमिका घेणाऱ्या महाजन यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली आहे.

महाजन यांनी देशाच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांनी दहशतवादाविरोधातील भारताच्या लढ्यालाच कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे देशविरोधी भूमिका घेणाऱ्या गिरीश महाजन यांची तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

ऑपरेशन ब्ल्यू स्टार ही कोणत्याही धर्माविरोधातील कारवाई नव्हती, तर भारताचे तुकडे करण्याचे कारस्थान रचणाऱ्या सशस्त्र खलिस्तानी दहशतवाद्यांविरोधात भारतीय सैन्यदलाने राबविलेली अत्यंत कठीण आणि आवश्यक मोहीम होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही देशाच्या एकता व अखंडतेला प्राधान्य देत हा कठोर निर्णय घेतला होता. त्यानंतर खलिस्तानी अतिरेक्यांनी त्यांची हत्या केली. या मोहिमेचे नेतृत्व करणारे महाराष्ट्राचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांनाही दहशतवाद्यांनी लक्ष्य करून त्यांची हत्या केली. देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वांच्या त्यागाचा अवमान करण्याचे काम गिरीष महाजन करत असल्याची टीका त्यांनी केली. गिरीश महाजन यांना ना इतिहास माहिती, ना यांचा कुठल्या विषयाचा अभ्यास आहे, परंतु भाजप सत्तेसाठी इतक्या खालच्या पातळीवर जाऊ शकतो. याचे हे उदाहरण आहे. त्यांना अतिरेकी, खलिस्तानी, ऑपरेशन ब्ल्यू स्टार या सगळ्या गोष्टी शाळेमध्ये विद्यार्थ्यांसमोर पिस्तूल घेऊन भाषण करण्यासारख्या किंवा गाववाल्यांना पिस्तूल घेऊन बिबट्या शोधण्यासारख्या वाटत असल्याची टीका काँग्रेसचे सचिव सचिन सावंत यांनी केली.

### पंतप्रधानांना पत्र लिहून हकालपट्टीची मागणी करणार - संजय राऊत

देशाचे पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांमध्ये थोडीजरी राष्ट्रभक्ती शिल्लक असेल तर गिरीश महाजन यांना मंत्रीपदावरून तसेच भाजपमधून हाकलून द्यायला हवे. पंजाबला हिंदुस्थानात कायम ठेवण्यासाठी सैन्याने जी दहशतवादविरोधी कारवाई केली त्याला जर काळा दिवस म्हणत असतील तर महाजनांसारखे देशद्रोही तेच आहेत. त्यांनी इंदिरा गांधी यांचे बलिदान व्यर्थ ठरवले आहे. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून महाजन यांच्या हकालपट्टीची मागणी करणार असल्याचे शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले.

### महाजन खलिस्तान समर्थक - शिशिर शिंदे

ऑपरेशन ब्ल्यू स्टार कारवाईस काळा दिवस संबोधणे, विभाजनवादी शक्तींबरोबर व्यासपीठावर बसणे यावरून गिरीश महाजन हे खलिस्तानी समर्थक वाटतात. सुमारे ३०० महिलांचे अपहरण करून त्यांना सुवर्ण मंदिरात डांबून ठेवणारा भिंद्रनवाले याचा महाजन यांना पुळका यावा हे सुद्धा आश्चर्यकारक आहे. अशा या महाजनांना घरचा रस्ता दाखविण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाचे उपनेते व माजी आमदार शिशिर शिंदे यांनी केली आहे.

# भारताचे इतिहासातील सर्वात मोठे पाऊल!

## पहिल्यांदाच प्रत्यक्ष कारवाईसाठी १२ अण्वस्त्रे तैनात; 'सिपरी'चा अहवाल




मुंबई : (स. गांवकरी)

भारताने इतिहासामध्ये पहिल्यांदाच प्रत्यक्ष वापरासाठी अण्वस्त्रे तैनात केली आहेत. भारताने १२ अण्वस्त्रे तैनात केली आहेत. शस्त्रास्त्रे आणि शस्त्र नियंत्रण या विषयांवर काम करणारी स्वीडनच्या नामांकित संस्था 'सिपरी' थिंक टँकने याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. चीनने देखील आपल्या तैनात अणुबॉम्बची संख्या २०२५ मधील २४ वरून २०२६ मध्ये ३४ केली आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'ने सोमवारी आपले सिपरी इयरबुक २०२६ प्रसिद्ध केले आहे. यामध्ये जगातील विविध देशांच्या अण्वस्त्र क्षमतांची माहिती देण्यात आली आहे. भारताचा अण्वस्त्रांचा केवळ साठा केला नसून, त्यातील काही प्रत्यक्ष मोहिमेसाठी तैनात केली आहेत आणि असे करण्याची ही पहिलीच वेळ आहे. जगातील देश आता राष्ट्रीय शक्तीचे साधन म्हणून अणुबॉबवर पूर्वीपेक्षा अधिक अवलंबून राहू लागले आहेत, असेही या अहवालात म्हटले आहे. अण्वस्त्राचे दोन प्रकार असतात एक म्हणजे साठ्यातील अण्वस्त्रे आणि दुसरी म्हणजे तैनात अण्वस्त्रे. गोदामात सुरक्षित ठेवलेली किंवा राखीव अण्वस्त्रांना साठ्यातील अण्वस्त्रं म्हटलं जातं. लष्कराच्या देखरेखीखाली असणारी ही अण्वस्त्र कोणत्याही क्षेपणास्त्रावर किंवा प्रक्षेपकावर बसवलेली नसतात. तात्काळ वापरासाठी नसली तरी गरज पडल्यास ती शस्त्रप्रणालीवर तैनात केली जाऊ शकतात. दुसरे म्हणजे आधीच युद्धनौका, विमाने किंवा क्षेपणास्त्रांवर बसवलेली तैनात अण्वस्त्रे. अगदी कमी वेळेत वापरण्यासाठी सज्ज ठेवली जातात. भारत आपली ही १२ तैनात अण्वस्त्रे 'न्यूक्लियर ट्रायड' तैनात केली आहेत.

## थोडक्यात...

### अहवाल येण्यापूर्वी आणखी दोन समित्या

मुंबई (स. गांवकरी) : कांद्याची साठवणूक करण्यासाठी शेतकरी कांद्याची 'चाळ' उभारतात. पण, राज्य सरकार कांदा प्रश्नी वेळकाढूपणा करण्यासाठी समित्यांचीच 'चाळ' उभारताना दिसत आहे. सुनील पवार समितीचा अहवाल कुलूप बंद असतानाच पाशा पटेल यांची समिती नेमली. पटेल समितीचा अहवाल येण्यापूर्वीच अपर मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, मंगळवारी या समितीच्या अंतर्गत पुन्हा उपसचिव स्तरीय उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.

### प्रसाद म्हणून निकृष्ट पेढ्यांची विक्री

राहाता (स. गांवकरी) : साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणारे भाविक साई मंदिर परिसरातील दुकानदारांकडून प्रसाद विकत घेतात. अनेक दुकानातून भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री सुरू असल्याच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासनाने आज, मंगळवारी शिर्डीत धाडसत्र राबवत पेढ्यांचे नमुने घेतले. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुकानदारांविरुद्ध कारवाई करणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले. साई मंदिर परिसरात पान, फुले व प्रसाद विक्रीची दुकाने आहेत. भक्तांना निकृष्ट दर्जाचा पेढा म्हणून प्रसाद देण्यात येतो. या पेढ्याच्या बॉक्सवर उत्पादन केल्याची व मुदत संपल्याची तारीख नसते. पेढ्याचा दर्जा भाविकांना माहित नसतांना तो दहा दिवस चालतो असे उत्तरे दुकानदार देतात. हा पेढा नेमका कुठे आणि कोण बनवतो याबाबत उल्लेखच नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. अक्षरशः दगडासारख्या पेढा प्रसाद म्हणून काही दुकानदारांकडून साईभक्तांना विक्री केली जातो. पॅकिंग केलेल्या पेढ्यांना बुरशी लागल्याचं देखील दिसून आले आहे.

### लांजा पोलीस ठाण्यात हिंदू मोर्चा

रत्नागिरी (स. गांवकरी) : शिपोशी येथील एका तरुणीला मुस्लिम तरुणाने प्रेमसंबंधांच्या माध्यमातून फूस लावून पळवून नेल्याचा आरोप करत शिपोशी पंचक्रोशीतील नागरिक आणि हिंदू संघटनांचे कार्यकर्ते सोमवारी लांजा पोलीस ठाण्यावर धडकले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच तरुणीच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

### राजू शेट्टी यांची देवेंद्र फडणवीसांवर टीका

कोल्हापूर (स. गांवकरी) : कोल्हापूर जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाविरोधात पुन्हा एकदा तीव्र आंदोलन करण्यात आले. हा प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी १२ जिल्ह्यातून आलेले शेतकरी, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक भर उन्हात रस्तावर उतरले होते. यादरम्यान उपस्थितांना संबोधित करताना राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. आजवर आम्ही महाराष्ट्रातील अनेक मुख्यमंत्र्यांविरोधात लढलो; पण इतका लबाड मुख्यमंत्री मी माझ्या हयातीत बघितला नाही, असे नाव न घेता त्यांनी फडणवीसांवर टीका केली. शक्तिपीठ महामार्ग तुम्ही कशासाठी करता? आमच्या जीवावर का उठता? लक्षात ठेवा हे कोल्हापूर आहे. त्यामुळे आमच्या नादाला लागू नका, असा इशाराही राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला दिला. या आंदोलनात काँग्रेसचे खासदार शाहू महाराज छत्रपती, विधान परिषदेचे काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ठाकरे गटाचे स्थानिक नेतेही सहभागी झाले होते.

# मराठवाड्यात युरिया टंचाई गंभीर; कृषिमंत्र्यांकडून दखल

मुंबई : (स. गांवकरी)



आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर युरियासह अन्य रासायनिक खतांचा तुटवडा आहे. केंद्र आणि राज्य सरकार गतवर्षापेक्षा जास्त खते उपलब्ध असल्याचा दावा करीत आहे. पण, प्रत्यक्षात ग्रामीण भागात युरियाची मोठी टंचाई जाणवत आहे. मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीचे औचित्य साधून अनेक लोकप्रतिनिधींनी कृषिमंत्र्यांची भेट घेऊन युरिया टंचाईचे गाऱ्हाणे मांडले. मराठवाड्यात टंचाईची स्थिती अधिक गंभीर असल्याचे समोर आले आहे. मंत्रिमंडळ बैठकीचे औचित्य साधून भाजप आमदार सुरेश धस, शिवसेना आमदार कैलास पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) संदीप क्षीरसागर यांच्या अन्य तीन - चार आमदारांनी कृषिमंत्री भरणे यांची भेट घेऊन युरिया खताचा मोठा तुटवडा आहे. मतदारसंघाला मंजूर असलेला युरिया तत्काळ उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली. लोकप्रतिनिधींची समजूत काढताना कृषिमंत्र्यांची दमछाक होत होती. युरियाची टंचाई आहे, पर्यायी खतांचा वापर करावा. कोणत्याही मतदारसंघावर अन्याय होणार नाही, असे सांगत भरणे यांनी कृषी अधिकाऱ्यांना मंजूर खत साठा त्या - त्या तालुक्यांना तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

# नव्या वर्षात तरी गटशिक्षणाधिकारी मिळेल का?

## अकोल्यात प्रभारी राजवट; शिक्षण व्यवस्था कोलमडतेय

अकोले : (स. गांवकरी)




प्रशासकीय अधिकारी हे शासकीय यंत्रणेचा कणा असतात. मात्र, सर्वत्र शाळा १५ जून रोजी सुरू होणार असल्या तरी अकोले पंचायत समितीतील शिक्षण विभागाचा कणा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे मोडला आहे. अकोले पंचायत समितीला गटशिक्षणाधिकारी नसल्याने विस्तार अधिकाऱ्यांकडे 'प्रभारी' पदभार सोपविण्यात आला आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात तरी अकोलेल्या कायमस्वरुपी गटशिक्षणाधिकारी मिळतील का, याकडे पालकांचे लक्ष आहे.


अकोले आदिवासी भाग असताना काही शाळांची गुणवत्ता चांगली आहे. मात्र अनेक शाळा आजही मागे असल्याचे चित्र आहे. अनेक वर्षांपासून अकोले शिक्षण विभागाला कायमस्वरूपी गटशिक्षणाधिकारी मिळत नसल्यामुळे आणि त्यातच प्रभारी राजची व्यवस्था निर्माण झाल्यामुळे आता शिक्षण विभागातील अनेक गोष्टींची बाहेर चर्चा होत आहे. यात तालुक्याचे राजकारणही थेट पंचायत समितीत हातपाय पसरवताना दिसत आहे. यातूनच प्रशासकीय उलथापालथी केल्या जात आहे. कधी प्रभारी नेमणुका दिल्या जातात तर त्यांना हटवलेही जात आहे. मध्यंतरी झालेल्या घडामोडी देखील याचाच भाग असल्याची चर्चा आहे. दरम्यान, गटशिक्षणाधिकारीच नव्हे तर ३३ केंद्रप्रमुखांपैकी २१ केंद्रप्रमुखांची पदे रिक्त आहेत. १० विस्तार अधिकाऱ्यांपैकी १ पद रिक्त आहे. तालुक्यात ३८८ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय आश्रम शाळा व विविध शैक्षणिक संस्था अशा १२६ शाळा आहेत. मात्र 'प्रभारी राज' मुळेच शिक्षणाचे बाजारीकरण होताने दिसून येते आहे. शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून दोरगे यांना प्रभार देण्यात आला आहे. मात्र, त्यांचा अंकुश किती असेल, याविषयी साशंकता आहे. परंतु, सध्यातरी शहरातील प्रतिष्ठित शाळेतील शिक्षकांनी गल्लीबोळांत खाजगी शिकवणीची दुकाने थाटली असून, याकडे दोरगे यांचे दुर्लक्ष असल्याचे नाकारून चालणार नाही.

आदिवासी तालुका असलेल्या अकोले तालुक्यात परिस्थिती नसतानाही पालकांना आपल्या पाल्याला शिकवणी वर्ग लावावा लागत असल्याची स्थिती आहे. शाळेचा पगार घेऊनही खाजगी शिकवणी वर्ग चालू असतील तर ते शिक्षक शाळेत काय शिकवत असतील? असा प्रश्न उपस्थित करत शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी पालकांमधून केली जात आहे.

> आदिवासी तालुका असलेल्या अकोले तालुक्यात अनेक वर्षापासून गटशिक्षणाधिकारी हे पद रिक्त आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर भेटायचे झाले तरी प्रभारी गटशिक्षण अधिकारी पालकांना भेटत नाहीत. अनेकदा पंचायत समितीतील शिक्षण विभागाच्या दारात चकरा माराव्या लागतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता व शिक्षणाबाबत धोरणात्मक निर्णय होताना दिसत नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी कायमस्वरुपी गटशिक्षणाधिकारी द्यावा.
>
> **- रवींद्र सूर्यभान पुंडे, पालक अकोले**

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये अमानुष रक्तपात!

## लष्करी कारवाईत १९ लहान मुले, ७ गर्भवती महिलांचा मृत्यू; गोपनीय अहवालात खळबळजनक खुलासा



मुंबई : (स. गांवकरी)

पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तान सरकारविरोधात घोषणाबाजी करणाऱ्या आंदोलकांवर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पाकिस्तानी लष्कराच्या या कारवाईत अनेक निष्पाप नागरिकांचा बळी गेला. धक्कादायक बाब म्हणजे यामध्ये लहान मुले आणि गर्भवती महिलांचाही मृत्यू झाल्याचे एका गोपनीय अहवालातून समोर आले आहे. पाकिस्तानी सुरक्षा दलांनी ५ जून ते ९ जून दरम्यान पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमध्ये चालवलेल्या अत्यंत क्रूर लष्करी कारवाईबाबत अनेक धक्कादायक खुलासे यात करण्यात आले आहेत. 'इंडिया टुडे'ने या गोपनीय अहवालाच्या हवाल्याने एक वृत्त प्रसिद्ध केले आहे. यातून अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. पाकिस्तानी सैन्य आणि पोलिसांनी केलेल्या कारवाईत १९ लहान मुले आणि ७ गर्भवती महिलांचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक दावा या अहवालात करण्यात आला आहे. या अमानुष अत्याचाराची आंतरराष्ट्रीय समुदायाने तातडीने चौकशी करावी, अशी मागणीही या अहवालातून करण्यात आली आहे. जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी या संघटनेच्या नेतृत्वाखाली स्थानिकांनी पाकव्याप्त काश्मीरमधील वाढती बेरोजगारी, महागाई, आर्थिक संकट आणि मानवाधिकार उल्लंघन याच्या विरोधात उग्र आंदोलन छेडले आहे. हे आंदोलन चिरडण्यासाठी पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमध्ये तब्बल १४,००० जवान तैनात केले आहेत.

आंतरराष्ट्रीय माध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, एका व्यक्तीच्या अंत्ययात्रेसाठी जमलेल्या नागरिकांवर सुरक्षा दलाच्या जवानांनी बेछूट गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंबधितचे अनेक व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. दरम्यान, पाकिस्तान सरकारने संपूर्ण पाकव्याप्त काश्मीरमध्ये इंटरनेट आणि दळणवळण यंत्रणांवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या आंदोलनात जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीच्या अनेक नेत्यांना आणि आंदोलकांना ठार करण्यात आले असून, अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे. या हिंसाचाराला पाकच्या लष्कराला जबाबदार धरले जात असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी व्हावी, असे या अहवालात नमूद केले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, सध्या मिरपूर, मुझफ्फराबाद, गिलगिट-बाल्टिस्तान, दडियाल, रावळकोट, सुधनोती आणि तात्तापानी या भागात आंदोलनाचा भडका उडाला आहे. एवढेच नव्हे तर ब्रिटनमध्ये राहणाऱ्या काश्मिरी स्थलांतरितांनी लंडनमधील पाकिस्तानी दूतावासाबाहेर निदर्शने केली. या घटनेची दखल घेत ब्रिटनच्या ३० खासदारांनी ब्रिटिश सरकारला पत्र लिहून घडलेल्या प्रकाराबाबत चिंता व्यक्त केली तसेच, हिंसाचार थांबवण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी केली.

### भारताकडून निषेध, आंतरराष्ट्रीय स्तरावर पडसाद

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला. "पाकव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तानची क्रूरता आता लपून राहिलेली नाही. आंतरराष्ट्रीय समुदाय पाकिस्तानला या दुष्कृत्यांबद्दल आणि मानवाधिकारांच्या उल्लंघनाबद्दल नक्कीच जाब विचारून धारेवर धरेल, अशी आम्हाला आशा आहे," असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले.

# कडक उन्हाळ्यामुळे शाळांच्या वेळापत्रकात बदल

वर्धा : (स. गांवकरी)




राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपवून नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने ९ जून २०२६ रोजी एक अत्यंत महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. या सुधारित आदेशानुसार, विदर्भातील तीव्र उन्हाळा आणि वाढते तापमान लक्षात घेता तेथील शाळा उशिराने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विदर्भातील शाळा आता १५ जूनऐवजी सोमवार, २२ जून २०२६ पासून सुरू होणार आहेत, तर उर्वरित महाराष्ट्रातील शाळा नेहमीप्रमाणे सोमवार, १५ जून २०२६ पासूनच नियमित वेळेत सुरू होतील, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत पत्रकानुसार, संपूर्ण राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांमध्ये उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता व सुसंगती आणण्यासाठी आधी सर्व शाळा १५ जून रोजी सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, विदर्भातील तापमानाचा पारा प्रचंड वाढलेला असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, ही बाब समोर आली होती. विदर्भातील या कडक उन्हाचा विचार करता शाळा सुरू करण्याबाबत 'महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समिती, पुणे’ व इतरांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका (Writ Petition No. 4067/2026) दाखल करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन शासनाने हा महत्त्वपूर्ण बदल केला आहे.शाळा सुरू होण्याची तारीख आता अशी राहणार. विदर्भातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सोमवार, दिनांक २२ जून २०२६ पासून सुरू होतील. २२ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत विदर्भातील सर्व शाळा केवळ सकाळच्या सत्रात भरवल्या जातील, जेणेकरून दुपारच्या कडक उन्हाचा त्रास विद्यार्थ्यांना होणार नाही. १ जुलै २०२६ पासून विदर्भातील शाळा पूर्ववत पूर्ण वेळेत आणि नियमित वेळापत्रकानुसार भरतील.

# अधिकारी गैरहजेरीचा प्रश्न ऐरणीवर; पाणीपुरवठा विभागावर गंभीर आरोप!

- अकोले पंचायत समितीत खुर्च्या हजर, अधिकारी गायब; पाणीप्रश्नावर ग्रामस्थ संतप्त!
- कार्यालयात पंखे फिरतात, पण अधिकारी कुठे फिरतात? अकोलेत नागरिकांचा सवाल!
- 'साईटवर गेलो' हेच उत्तर; अकोले पंचायत समितीतील गैरहजेरीवर संशयाची पाल!
- पाणीपुरवठा विभागाचा कारभार रडारवर; ग्रामस्थांना अधिकाऱ्यांचा शोध घ्यावा लागतोय!

(स. गांवकरी)

अकोले पंचायत समितीतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कथित गैरहजेरीमुळे सर्वसामान्य ग्रामस्थांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. विशेषतः पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून, जिल्हा परिषद प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पंचायत समिती कार्यालयात सोमवार ते गुरुवार अधिकारी उपस्थित राहण्याबाबत फलक लावण्यात आलेला असतानाही अनेकदा संबंधित अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसतात. कार्यालयात चौकशी केल्यास "साईटवर गेले आहेत" असे उत्तर दिले जाते. मात्र त्यांनी कोणत्या गावाला भेट दिली, कोणत्या कामासाठी गेले याची नोंद हालचाल रजिस्टरमध्ये नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.




विशेष म्हणजे अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने हे नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहून दैनंदिन कामकाजावर लक्ष ठेवत असल्याचे अनेक ग्रामस्थ सांगतात. मात्र त्यांच्या अधिपत्याखालील काही विभागांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

पाणीपुरवठा हा ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वाचा विषय असताना संबंधित विभागातील अधिकारी ग्रामस्थांना वेळेवर उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. उन्हाळ्याच्या काळात अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी टँकर व्यवस्थापनावरून वाद निर्माण झाले. बेलापूरसह विविध गावांमध्ये पाणी प्रश्नावर नागरिकांचा रोष पाहायला मिळाला. या परिस्थितीस जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक आणि सरपंच यांनाच संबंधित अधिकाऱ्यांना शोधत फिरावे लागत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. गावातील पाणीपुरवठा योजनांबाबत माहिती घेण्यासाठी ग्रामस्थ पंचायत समिती कार्यालयात येतात; मात्र संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्याने त्यांना निराश होऊन परतावे लागत असल्याचे चित्र आहे.

काही कर्मचारी व अधिकारी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने त्यांच्यामध्ये मनमानी वाढल्याचा आरोपही पुढे येत आहे. स्थानिक पातळीवर राजकीय हस्तक्षेप, दबावगट आणि कथित आर्थिक व्यवहारांबाबतही चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. काही फाईली पुढे सरकवण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचे आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असले तरी याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी पंचायत समितीतील

## ठळक मुद्दे

- सोमवार ते गुरुवार अधिकारी उपस्थित नसल्याची ग्रामस्थांची तक्रार.
- पाणीपुरवठा विभागातील उपअभियंत्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह.
- हालचाल रजिस्टरमध्ये साईट भेटींच्या नोंदी नसल्याचा आरोप.
- गटविकास अधिकारी अमर माने नियमित उपस्थित असल्याची ग्रामस्थांची प्रतिक्रिया.
- जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशी करण्याची मागणी.
- पाणी प्रश्नावर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी.

अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची, हालचाल रजिस्टरची, प्रलंबित कामांची आणि पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा प्रश्नही आता ऐरणीवर आला आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या प्रकरणाकडे लक्ष देऊन ग्रामस्थांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पंचायत समितीचे कार्यालय भव्य आणि सुसज्ज असले तरी अधिकारी-कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसतील तर त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण जनतेला बसतो. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## जिल्हा परिषद शाळेवरील अतिक्रमण हटविण्याची विष्णू बुरे यांची मागणी

- प्रशासनाला आंदोलनाचा इशारा!

अरक (स. गांवकरी) : ग्रामपंचायत अरक येथील जिल्हा परिषद शाळेच्या जागेवरील कथित अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी विष्णू बुरे यांच्याकडून करण्यात आली असून, येत्या ११ जून २०२६ पर्यंत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संबंधित नागरिकांनी दिला आहे. निवेदनानुसार, शाळेवरील अतिक्रमणाबाबत अनेक वेळा ग्रामपंचायत तसेच संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात १२ जून २०२६ रोजी ग्रामपंचायत अरक कार्यालयासमोर फटाक्यांची आतषबाजी व महापूजा करून सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य आणि शाळा समिती पदाधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेचा निषेध व्यक्त करण्यात येणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी जाहीर केले आहे. त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता पंचायत समिती मंगरूळपीर येथील गटविकास अधिकारी (बीडीओ) कार्यालयासमोर यापूर्वी दिलेल्या निवेदनांच्या प्रती फाडून अथवा जाळून निषेध नोंदविण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर टोकाचे पाऊल उचलण्याचा इशारा दिला असून, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहात मोफत प्रवेश

पाथर्डी (स. गांवकरी) : बहुजन शिक्षण संघ अहमदनगर संचलित पाथर्डी तालुक्यातील पाथर्डी शहरात मिलिंद विद्यार्थी वसतीगृह पाथर्डी येथे सन 2026 - 2027 या शैक्षणिक वर्षासाठी शैक्षणिक सुविधा पासून वंचित असलेल्या घटकांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी बहुजन शिक्षण संघाचे कार्यकारी विश्वस्त तथा विधीतज्ञ ॲड संघराज रूपवते कार्यकारी रजिस्ट्रार राजेंद्र एडके आणि मिलिंद विद्यार्थी वसतीगृहाचे अधिक्षक सुंदरदास कांबळे यांच्या वतीने अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विमुक्त जाती भटक्या जमाती सह आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. बहुजन शिक्षण संघाने गेल्या 70 वर्षा पासुन अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शिक्षणा पासून वंचित असलेल्या घटकांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासन निर्णयानुसार त्यांना वसतीगृहात प्रवेश देऊन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. वसतीगृहात विद्यार्थ्यांना सकाळचा नाश्ता दोन वेळचा सकस आहार, आठवडे बाजार दिवशी भेळभत्ता, पंधरा दिवसांत एकदा मिष्टान्न, महीण्यात एकदा नॉनव्हेज जेवण देण्यासाठी वसतीगृह प्रशासन प्रयत्नशील असतात.मिलिंद विद्यार्थी वसतीगृह पाथर्डी येथे इयत्ता 5 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन अंगाचा साबण, कपड्यांचा साबण, कोलगेट, ब्रश, खोबरेल तेल, गादी, कपाट, ताट तांबे, ग्लास वर्षभर मोफत उपलब्ध करून दिले जाते तसेच अंघोळीला गरम पाणी, पिण्याच्या पाण्यासाठी आर. ओ. चे पाणी सुसज्ज वाचनालयाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात तसेच वस्तीगृहाच्या परिसरात सी सी टि व्ही निगराणी असते. विद्यार्थ्यांना सामाजिक शैक्षणिक स्पर्धात्मक परीक्षा यावर शाळेतील तज्ञ शिक्षका कडून मार्गदर्शन घेतले जाते. अहमदनगर जिल्ह्यातील बहुजन शिक्षण संघाच्या प्रत्येक तालुक्यात वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी अधिक्षक सुंदरदास कांबळे यांच्याशी संपर्क साधून प्रवेश घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## महागाईविरोधात महाविकास आघाडी आक्रमक; कळवण तहसीलवर मोर्चा

कनाशी (स. गांवकरी) : कळवण पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडरची दरवाढ, कांद्याला हमीभाव नसणे व वाढत्या महागाईच्या विरोधात कळवण तालुका महाविकास आघाडीच्या वतीने बुधवार, १० जून रोजी सकाळी ११.०० वाजता कळवण तहसील कार्यालय, कोल्हापूर फाटा येथे तहसीलदारांना निवेदन देण्यात येणार आहे. यावेळी महाविकास आघाडीची एकजूट याबाबत तालुका काँग्रेसचे अध्यक्ष के. के. गांगुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख, शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अंबादास जाधव, आदिवासी जिल्हाध्यक्ष राम चौरे व काँग्रेस महिला तालुकाध्यक्षा शितलताई महाजन यांनी माहिती दिली. सर्व महाविकास आघाडी पदाधिकारी व फ्रंटल संघटनांच्या अध्यक्षांनी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. या आंदोलनात माजी आमदार काशिनाथ बहीरम, सुमित्राताई बहीरम, महाराष्ट्र प्रदेश सचिव शैलेशदादा पवार (मा. जि. प. सदस्य), शहराध्यक्ष अतुल पगार, पर्यावरण जिल्हाध्यक्ष नाना देवरे, नाशिक जिल्हा सरचिटणीस योगेश गायकवाड, युवक तालुकाध्यक्ष मयूर बेनके, बबन कोल्हे, नरेंद्र भावसार, संतोष भोये, डॉ. महाजन, कॉम्रेड सक्रेटरी, कॉम्रेड पाडवी दादा, रामा पाटील, सुनील बस्ते, एकनाथ वाघ यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# टोमॅटो दरात तेजी; पण तीव्र उन्हामुळे उत्पादनात घट

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर परिसरात वाढत्या उष्णतेमुळे टोमॅटो पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून उत्पादन घटल्याने बाजारातटोमॅटोच्या दरात चांगली वाढ झाली आहे. सोमवारी नारायणगाव बाजारात टोमॅटोचे दर प्रति कॅरेट ६०० ते ९०० रुपयांपर्यंत पोहोचले. वाढलेल्या दरामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळत असला तरी वाढलेला भांडवली खर्च त्यांच्या चिंतेत भर घालत आहे. जुन्नर तालुक्यात पूर्वी मोठ्या प्रमाणावर टोमॅटोची लागवड केली जात होती. मात्र, हवामानातील बदल, पाण्याची कमतरता आणि वाढता खर्च यामुळे आता निवडक भागांमध्येच टोमॅटोचे उत्पादन घेतले जात आहे. उन्हाळ्यात पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी शेतकरी लवकर लागवड करतात, पण तीव्र उष्णतेमुळे रोपांची मर



वाढते, फुले गळतात आणि शेतकरी अर्चना प्रमोद ढमाले म्हणाल्या की, "उन्हाळ्यात टोमॅटो पिकाची विशेष काळजी घ्यावी लागते. उष्णतेमुळे रसशोषक किडी, कोळी रोग आणि व्हायरसचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे वेळोवेळी औषध फवारणी आणि पाणी व्यवस्थापन करावे लागते." या उपाययोजनांमुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

# राजकीय बदनामीचे षड्यंत्र सहन करणार नाही

- खोटे आरोप करणाऱ्यांवर अब्रूनुकसानीचा दावा दाखल करू – सचिन देशमुख

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यात अवैध दारू विक्री व गुटखा विक्रीच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या राजकीय वातावरणात आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले असून, भारतीय जनता पक्षाचे युवा नेते सचिन गणपतराव देशमुख यांनी आपल्यावरील आरोपांचे खंडन करत खोटा प्रचार करणाऱ्यांना कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही राजकीय आणि वैचारिक विरोधकांकडून त्यांची सामाजिक व राजकीय प्रतिमा मलिन करण्यासाठी जाणीवपूर्वक खोटा प्रचार केला जात आहे. अवैध दारू विक्रीशी संबंधित एका व्यक्तीकडून बोलून घेऊन संपादित व्हिडिओच्या माध्यमातून




आपण हप्ते घेत असल्याचा अपप्रचार केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. "माझा कोणत्याही बेकायदेशीर व्यवहाराशी कधीही संबंध नव्हता आणि नाही. अनेक वर्षांपासून अवैध धंद्यांविरोधात मी भूमिका घेत असल्यामुळे काही जण अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळेच माझी बदनामी करण्यासाठी अशा नीच पातळीवरील कारस्थानांचा आधार घेतला जात आहे," असे देशमुख यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अकोले तालुक्यात अवैध दारू विक्री आणि गुटखा विक्रीच्या मुद्द्यावर काही लोकप्रतिनिधींनी थेट रस्त्यावर उतरून आंदोलनात्मक भूमिका घेतली आहे. याबाबत बोलताना देशमुख म्हणाले की, अवैध व्यवसायांवर कारवाई करणे स्वागतार्ह असले तरी हा विषय केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित न ठेवता विधानसभेत आणि शासनस्तरावर प्रभावीपणे मांडला जावा. "सर्व यंत्रणा सरकारच्या अखत्यारित असताना केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करून त्याचे राजकीय आयुष्य संपविण्याचा प्रयत्न होऊ नये. जनतेला सर्व वस्तुस्थिती माहिती आहे," असेही त्यांनी नमूद केले. देशमुख यांनी पुढे सांगितले की, देशमुख परिवाराने आजपर्यंत समाजात देण्याची भूमिका जपली आहे. स्वर्गीय मधुकरराव पिचड आणि वैभव पिचड यांच्यासोबत काम करताना जनतेने आपले कार्य पाहिले आहे. त्यामुळे खोट्या आरोपांनी आपली प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही."जो कोणी माझ्या, माझ्या कुटुंबाच्या किंवा कार्यकर्त्यांच्या बदनामीचा प्रयत्न करेल त्याच्याविरोधात आम्ही कायदेशीर मार्गाने लढू. न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. आवश्यक असल्यास अब्रूनुकसानीचे दावे दाखल करून योग्य उत्तर दिले जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

अवैध दारू विक्रीच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रश्न उपस्थित करत, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यांवर प्रभावी कारवाई का झाली नाही, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

"सत्याचा मार्ग कठीण असला तरी तो कधी पराभूत होत नाही. राजूरची सुज्ञ जनता खरे आणि खोटे ओळखते. त्यामुळे खोट्या प्रचाराला बळी पडू नका," असे आवाहनही सचिन देशमुख यांनी केले.

# शिर्डीतील 'साई तीर्थ' बनले पर्यटकांचे नवे आकर्षण

शिर्डी : (स. गांवकरी)

- भक्ती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम
- श्रेया मालपानी, संचालक, मालपानी ग्रुप

शिर्डीची सहल आता केवळ साईबाबांच्या दर्शनापुरती मर्यादित राहिलेली नसून, आधुनिक पर्यटनाच्या दृष्टीने नव्या अनुभवांची भर पडत आहे. साईबाबा मंदिरापासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेले 'साई तीर्थ भक्ती थीम पार्क' हे शिर्डीतील प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणून उदयास आले आहे. भक्ती, संस्कृती, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा संगम असलेल्या या थीम पार्कमुळे पर्यटकांना एकाच छताखाली वेगळा अनुभव मिळत आहे.

मालपानी ग्रुपच्या संचालिका श्रेया मालपानी यांनी 'साई तीर्थ'मधील पाच प्रमुख आकर्षणांची



माहिती देताना सांगितले की, भारतातील पहिले पूर्णपणे वातानुकूलित इनडोअर भक्ती थीम पार्क म्हणून 'साई तीर्थ'ची ओळख आहे. दर्शनानंतर कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, मुले आणि तरुणांसाठी हे एक आदर्श पर्यटनस्थळ ठरत आहे.

'तीर्थ यात्रा' या आकर्षणाद्वारे पर्यटकांना देशातील दहा प्रसिद्ध मंदिरांची आभासी सफर घडवली जाते. आधुनिक व्हिज्युअल इफेक्ट्स, मोशन टेक्नॉलॉजी आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारतातील विविध तीर्थक्षेत्रांचा अनुभव एकाच ठिकाणी घेता येतो.

साई तीर्थच्या जवळ असलेली द्वारकामाई ही साईबाबांच्या वास्तव्यामुळे विशेष महत्त्वाची मानली जाते. येथे आजही अखंड धुनी प्रज्वलित असून, शांत आणि आध्यात्मिक वातावरणामुळे भाविकांना अंतर्मुख होण्याची संधी मिळते. युवा कलाकार चिन्मय प्रभू यांनी शेकडो रुबिक्स क्यूब्स वापरून साकारलेले साईबाबांचे भव्य मोझॅक हे 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंदले गेले आहे. भक्ती आणि सर्जनशीलतेचा संगम असलेली ही कलाकृती पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

संध्याकाळच्या वेळी आयोजित करण्यात येणारा लेझर शो प्रकाश, ध्वनी, संगीत आणि अत्याधुनिक प्रोजेक्शन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साईबाबांचे जीवन आणि शिकवणी प्रभावीपणे सादर करतो. हा अनुभव पर्यटकांच्या भेटीला संस्मरणीय बनवतो.

'सबका मलिक एक' या सिनेमॅटिक सादरीकरणातून साईबाबांचे विचार, मानवता, करुणा, एकता आणि विश्वास यांचा संदेश प्रभावीपणे मांडला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सादर केलेला हा अनुभव सर्व वयोगटांतील पर्यटकांना भावनिकदृष्ट्या जोडून ठेवतो. साईबाबा मंदिराजवळील सोयीस्कर स्थान, आधुनिक सुविधा आणि भक्ती-मनोरंजनाचा संगम यामुळे 'साई तीर्थ' हे शिर्डीतील अविभाज्य पर्यटनस्थळ बनले आहे. त्यामुळे शिर्डीला भेट देणाऱ्या अनेक पर्यटकांसाठी 'साई तीर्थ'चा अनुभव हा सहलीचा महत्त्वाचा भाग ठरत आहे.

# आनंदगड येथे नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत

अकोले : (स. गांवकरी)

तालुक्यातील वीरगाव येथील आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज आनंदगड वीरगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधे प्रवेशित विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे सचिव डॉ. अनिल रहाणे संचालिका सौ सुप्रिया वाकचौरे सौ. गीता राहणे शिवराज वाकचौरे सानिका वाकचौरे प्राचार्य किरण चौधरी यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन तसेच औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वाराजवळ तसेच शालेय प्रांगणात भव्य सजावट करून प्रशस्त रांगोळी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या



संख्येने उपस्थित होते. आपल्या चिमुरड्यांचे केलेले कौतुक पाहून पालक भारावून गेले आधुनिकतेच्या व स्पर्धेच्या युगात सुद्धा आनंदगडाने आपली सांस्कृतिक परंपरा सिद्ध केली . महाराष्ट्रातील विश्वासनीय व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना ध्येयपूर्ती साठी मदत करणारे शैक्षणिक संकुल म्हणून आनंदगडाकडे पाहिलं जातं अशी प्रतिक्रिया पालक वर्गातून उमटली

# दरोड्यातील आरोपींना जामखेड पोलीसांनी केले जेरबंद

## दमदार कामगिरीमुळे जामखेड पोलिसांचे होत आहे सर्वत्र कौतुक

जामखेड : (स. गांवकरी)

जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे दि. ३१ मे रोजीच्या मध्यरात्री पडलेल्या दरोडा प्रकरणातील आरोपींना पकडण्यात जामखेड पोलिसांना यश आले असून या दमदार कामगिरीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबाबत सविस्तर असे की, जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे दिनांक ३१ मे रोजीच्या मध्यरात्री सुमारे १ : १० वाजता फिर्यादी कौशल्या आण्णासाहेब आढाव (वय-४८) व बहिन मैनाबाई पारे असे दोघी त्यांचे घरासमोर झोपलेले असताना अचानक आरडा ओरडा झाल्याचा आवाज आल्याने उठुन पाहीले



असता त्यांना त्यांचा भाऊ अंगद आढाव यास ३ ते ४ तोंडाला बाधलेले अनोळखी इसम त्यांचे हातात कोयता, गज, काठीने मारहान करीत होते. त्यावेळी फिर्यादीची बहिन मैनाबाई ही त्यांस सोडवायला गेली असता तीला पण मारहाण केली तसेच फिर्यादीचे आईचे घरातून आरडा ओरडा झाल्याने फिर्यादी आईकडे गेली असता फिर्यादीस तेथे तोंडाला बांधलेले २ अनोळखी इसमांनी फिर्यादीस व तिचे आईस मारहाण केली. व फिर्यादिचे गळ्यातील मिनी गंठन, कानातील झुबेफुले व फिर्यादीचे आईचे अंगावरील मनी त्यांनी ओढून घेतले व घरातील सामानाची उचकापाचक करुन फिर्यादी तसेच फिर्यादीचे बहिन व आई यांचे अंगावरील एकुण १,४०,००० रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने, फिर्यादीचे भावाचा १०,००० रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल व घरातील कपाटातील ४०,००० रुपये रोख रक्कम असे एकुण १,९०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरी करुन घेवून गेले आहेत. याबाबत फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन जामखेड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. 358/ 2026 भारतीय न्याय सहिंता 2023 चे कलम 310 (2) प्रमाणे दि 31/05/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुनह्याच्या तपास करताना जामखेड पोलिसांना गोपनिय माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा कुणाल राजू भोसले रा. राशिन ता. कर्जत जि. अहिल्यानगर याचेसह दोन विधीसंघर्षीत बालक यांनी व त्यांच्या इतर ४ ते ५ साथीदारांनी केला असल्याची खात्रीलायक माहीती मिळाल्याने पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी सदरची माहीती वरिष्ठांना कळवुन पोलीस उपनिरीक्षक किशोर गावडे, पोलीस नाईक रविंद्र वाघ, पोलीस कॉन्स्टेबल योगेश दळवी, दिपक बोराटे, जिब्राईल शेख, गणेश ढोबळे यांचे पोलीस पथक तयार करुन राशिन ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथे रवाना केले. नमूद पोलीस पथकाने कर्जत पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल दिपक कोल्हे व अर्जुन पोकळे यांचे मदतीने राशीन गावात जावून त्यांचे वास्तव्याचे ठिकाणी सापळा रचून कुणाल राजू भोसले रा. राशीन याचेसह त्याचे २ साथीदार विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले असता त्यांनी सदरचा गुन्हा इतर ४ ते ५ साथीदारांचे मदतीने केला असल्याची कबुली दिल्याने त्यास जामखेड पोलीस स्टेशन येथे घेवून आलो असुन नमुद गुन्ह्यामध्ये त्यास अटक करुन जेरबंद केले आहे.

सदरची कारवाई अहिल्यानगर पोलीस दलाचे पोलीस अधिक्षक सुदर्शन मुमक्का, अपर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, कर्जत विभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली जामखेड पोलीस पथकाने केली असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल तुकाराम सोनवणे हे करित आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शस्त्रक्रियेसाठी 35 नागरिकांना मोफत मोतीबिंदू व लेन्ससाठी पाठवले

मुंबई (स. गांवकरी) : आज दिनांक 09/06/2026 वार मंगळवार रोजी माय माऊली केअर सेंटर, समता फाउंडेशन मुंबई, व एच व्ही देसाई हॉस्पिटल महंमदवाडी पुणे. यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिये साठी एच व्ही देसाई हॉस्पिटल मंहमदवाडी पुणे या ठिकाणी माय माऊली केअर सेंटर येथून 35 नागरिकांना कात्रज, कोंढवा,बिबवेवाडी, पद्मावती,वारजे धायरी वडगाव शेरी, भोसरी, येरवडा, लोहगाव, हडपसर,शिवापूर वेल्हे पुणे या परिसरातील नागरिकांना माय माऊली केअर सेंटर येथून एच व्ही देसाई हॉस्पिटल मोहम्मद वाडी पुणे या ठिकाणी मोफत मोतीबिंदू लेन्स शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले यावेळी उपस्थित ला.विशाल वरुडे पाटील ला.विठ्ठलराव वरुडे पाटील संस्थापक,अध्यक्ष.माय माऊली केअर सेंटर पुणे,डिस्ट्रिक्ट ग्लोबल सर्विस टीम उपस्थित होते.



## दिव्यातील ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या सचिनच्या यशाचा गौरव

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या इयत्ता दहावीचा विद्यार्थी मास्टर सचिन पंडित याने एसएससी परीक्षेत 95.80% गुण मिळवत दिवा शहरात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचा विशेष सत्कार ठाणे महानगरपालिका (TMC) चे नगरसेवक मा. शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या गौरव सोहळ्यास शाळेचे विश्वस्त मा. महेंद्र दळवी सर, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सचिनच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि अभ्यासाप्रती असलेल्या समर्पणाचे विशेष कौतुक केले. सचिन हा मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ना फार चांगली ना फार कठीण असतानाही त्याने आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही त्याने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत दिवा शहर आपल्या कुटुंबियांसह ग्लोबल इंग्लिश स्कूलचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य आणि अथक परिश्रम असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. शाळा व्यवस्थापनाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष आभार व्यक्त केले. सचिन पंडित याचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून कठोर मेहनत, सातत्य आणि समर्पण यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते हे त्याने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.

## दिव्यात ठाकरे शिवसेनेचे अनोखे 'गटर पूजन' आंदोलन



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील नालेसफाईची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने पावसाळ्यात नागरिकांना जलतरणाचा सामना करावा लागू शकतो. ठाणे महानगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दिव्यात आज अनोखे 'गटर पूजन' आंदोलन करण्यात आले. कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत व कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण ग्रामीण विधानसभा उपजिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे आणि दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. दिवा शहर परिसरातील अनेक नाले व गटारांची सफाई अद्याप अर्धवट अवस्थेत असून, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, दिवा शहरातील नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही प्रत्यक्षात अपेक्षित कामे झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. यावेळी शिवसैनिकांनी गटर पूजन करून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध व्यक्त केला तसेच तातडीने संपूर्ण नालेसफाई करून नागरिकांना पावसाळ्यातील संभाव्य संकटातून दिलासा देण्याची मागणी केली. आंदोलनात कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत, जिल्हा सचिव भैय्यासाहेब पाटील, उपजिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे, कल्याण ग्रामीण विधानसभा संघटिका योगिता नाईक, शहरप्रमुख सचिन पाटील, उपशहरप्रमुख मारुती पडळकर, विभागप्रमुख योगेश निकम, संजय जाधव यांच्यासह उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख, संतोष कदम, उमेश भानसे, शशिकांत कुंभारगण, विलास उतेकर, तुषार सावंत. उपशाखाप्रमुख, गटप्रमुख आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## आंदोलक शेतकऱ्याने थेट सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना लावला फोन



सोलापूर (स. गांवकरी) : शेतकऱ्यांच्या ऊसाचे तब्बल एक कोटी ३० लाख रुपये गोकुळ शुगर साखर कारखान्याने बुडविले आहेत हे ऊसाच्या बिलाचे पैसे त्वरित मिळावे या मागणीसाठी गेल्या एक महिन्यापासून सोलापूर मध्ये आंदोलन सुरू झाले आहे या आंदोलनात शेतकरी आजारी पडत आहेत. तर असंख्य शेतकरी उघडे नागडे होऊन आंदोलन करत असल्याचे दिसून येत आहे आता तर थेट शेतकऱ्यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि सहकार आयुक्त यांना जाब विचारत आंदोलन सुरूच ठेवले आहेत आज शेतकऱ्यांनी थेट सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना फोन लावून थकलेल्या ऊस बिलाचे पैसे त्वरित देण्याची मागणी केली. गोकुळ शुगर वर जप्तीची कारवाई करीत शेतकरी बांधवाना त्यांच्या कष्टाचे 30 कोटी रुपये मिळवून देण्यासाठी मंत्री बाबासाहेब पाटील यांनी हमी दिली आहे. 12 दिवसा पासून शेतकरी घर दार सोडून रस्त्यावर, आंदोलन करत आहेत गोकुळ साखर कारखान्याची मनमानी सुरू असून मनमानी कारभार करत असल्यामुळे तसेच 30 कोटी १० लाख रुपये रुपये शेतकरी बांधवांचे बिल थकवल्याने आज आंदोलन करणारे शेतकरी बांधवाना भेट दिली त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच शेतकऱ्यांचे आंदोलन थेट राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,साखर आयुक्त यांच्या दरबारी कॉल करून शेतकरी बांधवाना बोलण्याची संधी दिली. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील सर्वोतोपरी जबाबदारी घेऊन तात्काळ साखर आयुक्त यांना कॉन्फरन्स कॉल वर घेऊन शेतकरी यांच्याशी संवाद साधला.

# अनधिकृत विजेचा वापर तात्काळ थांबवा

ठाणे : (स. गांवकरी)

पावसाळा जवळ येत असल्याच्या पार्श्वभूमीवर, टॉरंट पॉवर लिमिटेडने जनहितार्थ एक महत्त्वाची सुरक्षा सूचना जारी केली आहे. नागरिकांनी अनधिकृत विजेचा वापर पूर्णपणे थांबवावा आणि केवळ कायदेशीर व मीटर असलेल्या वीज जोडणीचाच वापर करावा, असे आवाहन कंपनीने केले आहे. काही व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी निश्चित सुरक्षा नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर वीज पुरवठा घेत असल्याचे कंपनीने अधोरेखित केले आहे. अशा अनधिकृत हुक आणि बायपास पद्धतींमुळे संपूर्ण वीज यंत्रणा कमकुवत आणि धोकादायक बनते. यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होतो.

या असुरक्षित नेटवर्कचा थेट परिणाम नियमित वीज वितरणावर होतो। अशा निकृष्ट दर्जाच्या बेकायदेशीर जोडण्यांमुळे वीज वाहिन्यांमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड (फॉल्ट) होतात. परिणामी, स्थानिक ट्रान्सफॉर्मर, यंत्रणेवर अतिरिक्त ताण येणे आणि वीज पुरवठा खंडित होणे अशा समस्या निर्माण होतात। याचा फटका प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना बसतो. या असुरक्षित नेटवर्कचे परिणाम केवळ वीज जाण्यापुरते मर्यादित नाहीत। यामुळे शॉर्ट सर्किट आणि आग लागण्यासारख्या गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता प्रचंड वाढते। अशा धोकादायक परिस्थितीमुळे निष्पाप नागरिकांही आपला जीव गमवावा लागू शकतो. पावसाळ्यात हा धोका अधिकच गंभीर बनतो. मुसळधार पाऊस, ठिकठिकाणी साचणारे पाणी आणि हवेतील ओलसरपणामुळे हे अनधिकृत आणि निकृष्ट दर्जाचे विजेचे तार अत्यंत संवेदनशील बनतात. यामुळे करंट पसरून मोठे अपघात होण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते. मानवी जीवनाचे रक्षण करण्यासाठी आणि अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, टॉरंट पॉवर जनतेला जबाबदारीने वागण्याचे जाहीर आवाहन करत आहे. नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्यांपासून दूर राहावे आणि केवळ अधिकृत, मीटर असलेल्या वीज पुरवठ्याचाच वापर करावा. नागरिक विजेचा बेकायदेशीर वापर किंवा वीज चोरीची माहिती टॉरंट पॉवरच्या 24x7 हेल्पलाइन वर कॉल करून देऊ शकतात.




# माळशिरस तालुक्यासाठी अभिमानास्पद क्षण

सोलापूर : (स. गांवकरी)

- दहिगाव ग्रामपंचायतीचा राज्यस्तरीय सन्मान

जय हिंद फाउंडेशन, सातारा यांच्या वतीने आयोजित "शहीद जवान परिवार कृतज्ञता सोहळा व महिला सक्षमीकरणासाठी विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान सोहळा" हा कार्यक्रम स्व. यशवंतराव चव्हाण सभागृह, सातारा येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास खणीकर्म व पर्यटन मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री.शंभूराज देसाई साहेब प्रमुख उपस्थित होते. राज्यभरातील निवडक १८ ग्रामपंचायतींना यावेळी गौरविण्यात आले. महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या उल्लेखनीय उपक्रमांची दखल घेत माळशिरस तालुक्यातील दहिगाव ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच सौ. सोनमताई रणजित खिलारे यांचा तसेच ग्रामपंचायतीचा विशेष सन्मान करण्यात आला. या अभिमानास्पद यशाबद्दल दहिगाव ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंच सौ. सोनमताई रणजित खिलारे यांचा तालुक्याच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या. महिला सक्षमीकरण, ग्रामविकास आणि लोकसहभागाच्या माध्यमातून दहिगाव ग्रामपंचायतीने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. दहिगाव ग्रामपंचायतीचे हे यश संपूर्ण माळशिरस तालुक्यासाठी गौरवास्पद असून सरपंच सौ. सोनमताई रणजित खिलारे, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

# प्रत्येक गावात मोफत बियाणे केंद्र सुरू करा : प्रणिती शिंदे

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना वेळेत, दर्जेदार आणि मोफत बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक गावात मोफत बियाणे वितरण केंद्र अथवा दुकान सुरू करण्यात यावे, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी शेतीवर अवलंबून असून त्यामध्ये अल्पभूधारक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. दरवर्षी बियाण्यांच्या वाढत्या किमती, हवामानातील बदल, दुष्काळी परिस्थिती आणि उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण होत असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेत दर्जेदार बियाणे मिळत नाहीत. परिणामी उत्पादनावर परिणाम होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागते. ही परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना गावपातळीवरच मोफत आणि दर्जेदार बियाण्यांची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. निवेदनात त्यांनी प्रत्येक गावातील केंद्रांमधून प्रमाणित व उच्च दर्जाची बियाणे उपलब्ध करून देणे, खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी आवश्यक बियाण्यांचा पुरेसा साठा ठेवणे, अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना प्राधान्य देणे तसेच ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहकार्याने वितरण व्यवस्था राबविण्याची सूचना केली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व राज्याचे गृह महसूल आणि ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांनी बुलढाणा जिल्ह्यातील

# दहा वर्षीय सिद्धीच्या धाडसी कार्याचा केला गौरव

बुलढाणा: (स. गांवकरी)

माउंट एवरेस्ट बेस कॅम्प , कळसुबाई शिखर ,शितकडा , कोकणकडा केदारकंठां सर करून तेथे तिरंगा ध्वज आणि भगवा ध्वज फडकवणाऱ्या दहा वर्षीय धाडसी सिद्धीचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे गृह महसूल ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते काल गौरव करण्यात आला बुलढाणा तालुक्यातील साखळी बुद्रुक या लहानशा गावात राहणारे विठ्ठल ज्ञानदेव सोनवणे यांची दहा वर्षीय कन्या सिद्धी हीने जिद्द धैर्य आणि सहासी पणा दाखवून वयाच्या सातव्या वर्षा कळसुबाईचे शिखर सर केलं त्यानंतर केदारकंठा कोकण कडा आणि नुकताच माउंट एवरेस्ट बेस्ट कॅम्प सर केला आहे प्रत्येक शिखरावर जाऊन तिने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भगवा ध्वज आणि तिरंगा फडकून राष्ट्रगीताने



मान मानवंदना दिली आहे अवघ्या दहा वर्षाच्या सिद्धीच धाडस हे कौतुकास्पद असून जिल्ह्यासाठी अभिमानाचा आहे सिद्धीच्या या धाडसी आणि पराक्रमी सहासाबद्दल केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव आणि या राज्याचे गृह महसूल ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांनी मेहकर पंचायत समितीच्या उद्घाटन कार्यक्रमात सिद्धीचा सत्कार केला.

याच वेळी सिद्धीने उपस्थितांसमोर मनोगत व्यक्त करण्याची इच्छा मंत्री महोदयासमोर व्यक्त केली दोन्ही मंत्र्यांनी तिच्या या धाडसी पणाला वाव देऊन माईक तिच्या हातात दिला . यावेळी सिद्धीने आतापर्यंत केलेल्या सहासी कामाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला त्यावेळी उपस्थितांनी तिचं टाळ्या वाजवून कौतुक केलं याशिवाय सिद्धीने आतापर्यंत 2 राज्यस्तरीयसह 25 मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे.

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सिद्धीला वेळोवेळी मदतीचा हात देण्यात आला आहे.

# जामखेड आगाराला ५ नवीन बसेस प्राप्त

जामखेड : (स. गांवकरी)

- विद्यार्थी व प्रवाशांना मिळणार सुरक्षित, आरामदायी प्रवासाची सुविधा

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जामखेड आगाराला ५ नवीन जिजाऊ बसेस प्राप्त झाल्या असून या बसेस आजपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जामखेड तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळाले असून विद्यार्थी तसेच सर्वसामान्य प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.




प्राप्त झालेल्या या जिजाऊ बसेस ३×२ आसन क्षमतेच्या असून आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहेत. या बसेसचा उपयोग प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या शालेय व महाविद्यालयीन फेऱ्यांसाठी तसेच स्थानिक बससेवा अधिक सक्षम करण्यासाठी केला जाणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वेळेवर आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून सर्वसामान्य नागरिकांनाही अधिक दर्जेदार वाहतूक सेवा मिळणार आहे. जामखेड तालुक्यातील अनेक गावांमधून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी, कामगार, शेतकरी व नागरिक प्रवास करीत असतात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता अतिरिक्त बसेसची आवश्यकता निर्माण झाली होती. ही गरज ओळखून प्रा. राम शिंदे यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून जामखेड आगारासाठी नवीन बसेस मंजूर करून घेतल्या. या नवीन बसेस प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व सुखकर प्रवासाचा अनुभव देणार असून स्थानिक बससेवेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर व नियमित वाहतूक सुविधा उपलब्ध होण्यासही या बसेस उपयुक्त ठरणार आहेत. जामखेड तालुक्याच्या विकासासाठी आणि जनहितासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या प्रा. राम शिंदे यांच्या मागणीला महायुती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत जामखेड आगाराला ५ नवीन जिजाऊ बसेस उपलब्ध करून दिल्या. याबद्दल प्रा. राम शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

नवीन बसेस सेवेत दाखल झाल्याने जामखेड तालुक्यातील प्रवासी, विद्यार्थी आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# शाळा आणि वसतिगृहात पाण्याचा तीव्र तुटवडा

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या आहवा येथील माध्यमिक शाळा आणि तिच्या शेजारील शासकीय वसतिगृहात सध्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येबाबत वासुर्णा स्टेटचे राजवी धनराजसिंह चंद्रसिंह सूर्यवंशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, या शासकीय वसतिगृहात डांग जिल्ह्यातील दुर्गम व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थी राहून शिक्षण घेत आहेत. मात्र गेल्या काही काळापासून पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की विद्यार्थ्यांना आंघोळ, पिण्याचे पाणी तसेच दैनंदिन



गरजांसाठीही पुरेसे पाणी मिळत नाही. शाळा व वसतिगृहातील या पाणीटंचाईमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून त्यांच्या शिक्षणावरही त्याचा नकारात्मक परिणाम होत आहे. डांगच्या भविष्यासाठी महत्त्वाचे असलेले हे विद्यार्थी अशा बिकट परिस्थितीत शिक्षण घेत असल्याने हा अत्यंत संवेदनशील आणि गंभीर प्रश्न असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# ऐतिहासिक हुतात्मा स्तंभ पडला अडगळीला !

## स्मारकाची देखरेखी अभावी मोठी दुरावस्था

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट शहरातील ऐतिहासिक हुतात्मा स्तंभ सध्या अडगळीला पडला आहे! याकडे कुणाचेही लक्ष नसल्याचे या हुतात्मा स्तंभाची मोठी दुरावस्था झाली आहे. हुतात्मा स्मारकाची झालेली दुरवस्था सध्या पाहणेही लाजीरवाणे झाले आहे. स्तंभाच्या देखरेखी अभावी ही मोठी दुरावस्था झाली असल्याचे सांगण्यात आले. अक्कलकोट शहरात भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आत्माअर्पण केलेल्या हुतात्म्यांच्या आणि कारावास भोगलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ नगर परिषदेकडून उभारण्यात आलेला हुतात्मा स्तंभ हा अडगळीला गेला आहे. एवन चौकातील श्री स्वामी समर्थ उद्यानात स्थलांतरित केलेला हुतात्मा स्तंभ पुन्हा एवन चौकात दर्शनी भागात निर्माण करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रप्रेमी नागरिकांतून केली जात आहे. अक्कलकोट शहरातील एवन चौकात नगर परिषदेकडून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन आत्मार्पण केलेल्या आणि कारवास भोगलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ हुतात्मा स्तंभ उभारण्यात आले होते. या हुतात्मा स्तंभावर सहा स्वातंत्र्यसैनिकांची नावे आणि भारतीय संविधानातील उद्देशिकाची कोनसीला लावण्यात



आली होती. अक्कलकोट नगर परिषदेकडून सध्या मंगरूळ हायस्कूल ते कारंजा चौकापर्यंत रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. पूर्वी एवन चौकात उभारण्यात आलेले हुतात्मा स्तंभ हे रस्ता रुंदीकरणामुळे एवन चौकाच्या बाजूस असणाऱ्या श्री स्वामी समर्थ उदयानात हलविण्यात आले आहे. सदरचे हुतात्मा स्तंभ हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिक असून भावी पिढीला प्रेरणा देणारे असताना नगरपरिषदेकडून हुतात्मा स्तंभ अडगळीला टाकण्याचा प्रकार झाला आहे. हुतात्मा स्तंभ हा दर्शनी भागात लावल्यास नागरिकांना तसेच शालेय विद्यार्थी यांना त्याचे दररोज दर्शन होणार आहे. एवन चौकातील हुतात्मा स्तंभास अभिवादन करून मोर्चे, आंदोलन , अभिवादन करणे आदी कार्यक्रम घेतले गेले आहेत. अक्कलकोट नगर परिषदेने सदरचे हुतात्मा स्तंभच अडगळीला टाकून भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास पुसण्याचे काम केल्याचा आरोप राष्ट्रप्रेमी नागरिकांतून केला जात आहे. अक्कलकोट नगर परिषदेने एवन चौकातील हुतात्मा स्तंभ पूर्ववत नगरपरिषदेच्या जागेतील दर्शनी भागात बसवावा अशी मागणी राष्ट्रप्रेमी नागरिकांतून केली जात आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते व विविध पक्षाच्या पदाधिकारी यांनी दिला आहे.

# धडक मोहिमेचे व्यापारी असोशिएनकडून स्वागत

राजगुरुनगर: (स. गांवकरी)

नागरिकांच्या आरोग्याच्या हिता करिता राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सुरू असलेल्या धडक मोहिमेचे राजगुरुनगर व्यापारी असोशिएन कडून स्वागत करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत व्यापारी, व विविध व्यावसायिक दुकानदार, प्रतिष्ठानांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यवसायाबाबत प्रशासनाने दिलेल्या नियमावली व अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. प्रसिद्ध कार्यक्षम अधिकारी तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेताच राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानदारांची तपासणी व कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत भेसळयुक्त पदार्थांची विक्री कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही तसेच अशा प्रकारांना व्यापारी वर्गाने थारा देऊ नये, असा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याशिवाय व्यावसायिक आस्थापनांमध्ये कार्यरत कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेबाबत विशेष चर्चा करण्यात आली. कामगारांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येक व्यावसायिकाची जबाबदारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कामगारांच्या आरोग्याची नियमित तपासणी, स्वच्छता, सुरक्षित कामकाजाची साधने तसेच आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सर्वांनी सकारात्मक भूमिका घेतली. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. ग्राहकांना दर्जेदार व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी व्यापाऱ्यांनी सतर्क राहावे, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.या मुख्य विषयाव्यतिरिक्त,शहरातील पार्किंग व्यवस्था,ट्रान्सपोर्ट भाडेवाढ या व इतर काही विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे राजगुरुनगर परिसरात सुरक्षित, पारदर्शक व जबाबदार व्यापार संस्कृतीला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीचे सूत्रसंचालन माणिक होरे व प्रास्ताविक स्वानंद खेडकर यांनी केले तर नियमावली बाबत विनय लोढा आणि सचिन कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन चंदन खारीवाल यांनी केले . बैठक यशस्वी पार पाडण्यासाठी,शाम चौधरी,अमर टाटिया, प्रविण शेटे,सूरज वाडेकर, राहुल वाळुंज, दिलीप तापकीर,श्रवणराम पटेल, जितेंद्र चव्हाण,सतिश थिगळे,पवन गदिया,विशाल कहाणे यांसह अनेक प्रतिनिधींनी प्रयत्न केले.



खोडद: भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा कामगार मोर्चाची कार्यकर्ता संवाद बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पुणे जिल्हा कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष किरणभाऊ राक्षे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हा सरचिटणीस दत्ताभाऊ गव्हाणे, राहुलभाऊ चौधरी, संजय भाऊ काळे ,भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष संतोषनाना खैरे, मंडळाध्यक्ष आशिषभाऊ माळवदकर, निलेश भाऊ चव्हाण विविध पदाधिकारी, महिला भगिनी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...

### मी सावित्रीची लेक विद्यार्थिनींना पुरस्कार



अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर मधील स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम, श्रमीकनगर, अहिल्यानगर.यांच्या वतीने दरवर्षी मी सावित्रीची लेक पुरस्कार 10 वी, आणि 12 वी मधे 70 पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यर्थिनींना दिला जातो, दिवंगत विठ्ठल बुलबुले सर यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. तरी मार्च 2026च्या परीक्षेत ज्या मुलींना 10 वी, आणि12 वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या आहेत.त्यांना मी सावित्रीची लेक पुरस्कार पुरस्कार दिला जाणार आहे.त्यासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मार्कशीट झेरॉक्स,आधार कार्ड झेरॉक्स,1 पासपोर्ट फोटो( फोटोला स्टेपलर पीन मारू नये), मोबाईल नंबर हे पुरस्कारासाठी लागणारे कागदपत्रे खालील पत्यावर पाठवावीत. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय करणाऱ्या मुली व महिला साठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे यासाठी इच्छुकांनी प्रस्ताव पाठवावेत, सर्व देणगीदार यांच्या सहकार्यातून व सर्व सभासद यांच्या परिश्रमातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात तरी अधिक माहिती साठी संपर्क स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम, अहिल्यानगर, श्रमीकनगर, सावेडी.नरेश कोटा मो 9689076471,वैभव कंदी 9096185945,विद्याताई एक्कलदेवी 7387761232, वंदनाताई दडगे 9511255656, राहुल दुलम 9595579795, सविताताई कोटा 9604146127 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत नवीन सेवार्थ प्रणाली ई-बिल संदर्भात प्रशिक्षण

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत "नवीन सेवार्थ प्रणाली e-bill" संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन नांदेड तालुक्यातील आहरण व संवितरण यांच्यासाठी बुधवार 10 जून 2026 रोजी सकाळी 11 वा. तसेच नांदेड वगळता सर्व तालुक्यातील आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी गुरुवार 11 जून 2026 रोजी सकाळी 11 वा. जिल्हा नियोजन भवन नांदेड येथे करण्यात आले आहे. संबंधीत लेखा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती शोभा मुंडे यांनी केले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात नवीन सेवार्थ प्रणालीच्या कार्यपदधती, अद्ययावत वैशिष्टये तसेच व्यवहारातील अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण श्रीमती वैशाली ताटापल्लेवार, अप्पर कोषागार अधिकारी व अप्पर कोषागार अधिकारी नामदेव राठोड तसेच नियुक्त मास्टर ट्रेनर कनिष्ठ लेखापाल शंकर दुमाने, लेखा लिपीक प्रमोद शिंदे, बसवेश्वर वाळके, सुनिल संगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडणार आहे. संबंधीत सर्व विभागांनी या प्रशिक्षणाचे लाभ घ्यावा व वेळेवर उपस्थित राहावे, असेही आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### वारसदारांचा शोध; संपर्क न केल्यास नोकरीचा दावा संपुष्टात

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : किनवट तालुक्यातील मारेगाव खालचे येथील ममता रेखा विविधकर यांच्या खूनप्रकरणी त्यांच्या पात्र वारसदारांना शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत शासकीय अथवा निमशासकीय नोकरी मिळण्याची संधी उपलब्ध असून, संबंधित वारसदारांचा शोध घेण्यासाठी समाज कल्याण विभागाने आवाहन केले आहे. ममता रेखा विविधकर यांच्या खूनाची नोंद किनवट पोलीस ठाण्यात गु.रं.नं. 137/2024, दि. 28 मे 2024 रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. 214, दि. 20 नोव्हेंबर 2025 नुसार अशा प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय अथवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने समाज कल्याण विभागाने मयत महिलेच्या वारसदारांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. विभागातील कर्मचाऱ्यांनी मारेगाव खालचे येथे प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता, वारसदार राज्याबाहेर वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. मात्र ते नेमके कुठे आणि कोणत्या राज्यात राहतात, याबाबत गावातील सरपंच, पोलीस पाटील व नागरिकांकडे कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. समाज कल्याण विभागाने मयत महिलेचे वारसदार, रक्ताचे नातेवाईक किंवा त्यांचा संपर्क असलेल्या व्यक्तींनी आवश्यक नातेसंबंधाची कागदपत्रे घेऊन पुढील 15 दिवसांच्या आत संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. निर्धारित मुदतीत संपर्क न झाल्यास शासकीय नोकरीसंदर्भातील दावा संपुष्टात येऊ शकतो, असे समाज कल्याण अधिकारी गजानन नरवाडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### साईबनमधील लालभडक गुलमोहर झाडाची रांग पर्यटकांना आकर्षण



अहिल्यानगर (स. गांवकरी) : गुलमोहर वृक्षाची असंख्य झाडे साईबनमध्ये असून हा फुललेला गुलमोहर येणाऱ्यां लोकांचे आकर्षण ठरत आहे,गुलमोहर हा उष्ण प्रदेशात वाढणारा वृक्ष आहे.याला इंग्लिशमध्ये मे फ्लॉवर ट्री असे नाव आहे. गुलमोहर हा वैशाखातल्या रणरणत्या उन्हातही फुलणारा वृक्ष आहे. हा वृक्ष बहरात नसतानाही इतर वृक्षांपेक्षा अधिक काळ हिरवाई टिकवतो. नगरमधील शिर्डी रोडवरील नागापूर एमआयडीसीच्या मागे असणाऱ्या साईबन कृषी पर्यटन केंद्रात उन्हाळ्याची सुट्टी संपत आल्यामुळे अनेक जण सहकुटुंब व ग्रुपने येत आहे.

# गुन्हे दाखल करण्याची आमदार संग्राम जगताप यांची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



महापालिकेत सत्ताधारी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांनीच महापालिकेच्या कारभाराबद्दल संतप्त भावना व्यक्त करत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्य सरकारकडे करणार असल्याचे सांगितले. महापालिकेच्या नगररचना विभागाच्या हलगर्जीपणामुळे विकासकामात अडथळे निर्माण होत आहेत. शहरातील ओढे-नाल्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांना अधिकाऱ्यांकडून प्रोत्साहन मिळत आहे. या अधिकाऱ्यांची राज्य सरकारकडे तक्रार करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार जगताप म्हणाले, शहरातील विकास आराखड्यातील रस्त्यांच्या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. काही रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत तर काही रस्त्यांची कामे अर्धवट आहेत. नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. महापालिकेच्या नगररचना विभागाने वेळेत रेखांकन करून देणे व अतिक्रमण विभागाने अडथळे देऊन दूर करणे गरजेचे असतानाही संबंधित विभागाकडून हलगर्जीपणा होत आहे. त्यामुळे विकासकामात अडथळे निर्माण होत आहेत. महापालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीचे कारभारामुळे कामे रखडत आहेत. रस्ते विकासासाठी आवश्यक असलेले रेखांकन वेळेत दिले जात नाही, अतिक्रमणे हटवली जात नाहीत, त्यामुळे ठेकेदारांना काम करताना अडचणी येतात. सुरू असलेली कामे अचानक थांबतात त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसतो. ठेकेदारांनी रेखांकन मिळाल्याशिवाय काम सुरू करू नयेत आणि काम सुरू केल्यानंतर ते अर्धवट सोडू नयेत. नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याने त्यांच्याविरोधात शासनाकडे कारवाईची मागणी करणार आहे. शहरातील अनेक ओढे-नाले बुजवण्याच्या प्रकारांना काही अधिकाऱ्यांचे अप्रत्यक्ष संरक्षण मिळत आहे. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांच्या घरात पाणी शिरण्याच्या घटना घडतात. शहरातील ओढे-नाले बुजवणाऱ्यांना अधिकाऱ्यांकडून प्रोत्साहन मिळत आहे. अशा अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही शासनाकडे करणार आहे. स्वतःची जबाबदारी झटकून एकमेकांवर दोषारोप करण्याचे काम काही अधिकारी करत आहेत. नागरिकांची दिशाभूल केली जात आहे.

# बँक कर्मचाऱ्याची फसवणूक करणारा आरोपीची छत्तीसगडमधून अटक

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

■ १.३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. बँक कर्मचाऱ्याची ऑनलाइन फसवणूक करून फरार झालेल्या एका आरोपीला डांग सायबर क्राईम पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे थेट छत्तीसगड राज्यातून अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सायबर क्राईम पोलीस स्टेशन, डांग-आहवा येथे नोंद झालेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीसांनी विशेष पथक तयार करून शोधमोहीम सुरू केली होती. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आलेल्या या सायबर फसवणुकीचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. तपासादरम्यान आरोपीचे लोकेशन छत्तीसगडमध्ये असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर डांग पोलिसांचे पथक तात्काळ छत्तीसगडला रवाना झाले आणि आरोपी प्रियांशू महेंद्र चंद्राकर (वय २२ वर्षे) याला अटक केली. आरोपी हा छत्तीसगड राज्यातील दुर्ग तालुक्यातील अंडा पोलीस स्टेशन हद्दीतील चंदखुरी गावातील सडकपारा परिसरातील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला पुढील चौकशीसाठी डांग-आहवा येथे आणण्यात आले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. तसेच त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

# जिल्हा परिषदेचा विद्यार्थी आरोग्यदूत उपक्रम

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

■ ८०० शाळांतील १,५०० विद्यार्थी करणार जनजागृती

■ मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली

ग्रामीण भागात आरोग्य, स्वच्छता, कृषी व पशुसंवर्धन विषयक जनजागृती अधिक प्रभावीपणे करण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने विद्यार्थी आरोग्यदूत हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ८०० शाळांमधील १ हजार ५०० विद्यार्थ्यांची आरोग्यदूत म्हणून निवड करण्यात आली असून त्यामध्ये तब्बल ९०० मुलींचा सहभाग आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली. माझं गाव आरोग्य संपन्न गाव या मोहिमेअंतर्गत हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे. आरोग्य व विज्ञान विषयाची आवड असलेल्या इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांची शाळास्तरावरील चाचणीद्वारे निवड करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेतून किमान एक, तर मोठ्या शाळांमधून दोन विद्यार्थ्यांची आरोग्यदूत म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष टी-शर्ट, ओळख बॅच तसेच विद्यार्थी आरोग्यदूत मार्गदर्शन पुस्तिका देण्यात येणार आहे. दर दोन महिन्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर दोन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून यापूर्वी समुदाय आरोग्य अधिकारी आणि शिक्षकांना प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे प्रशिक्षक विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन करणार आहेत. आरोग्यदूत विद्यार्थी शाळा, कुटुंब आणि ग्रामपातळीवर आरोग्यविषयक जनजागृतीचे कार्य करतील. आजारांपासून बचावासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय, प्राथमिक उपचार पेटीचा वापर, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता, घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व याबाबत ते मार्गदर्शन करतील. याशिवाय कृषी विभागामार्फत रानभाज्यांचे पोषणमूल्य, शेतीतील फवारणीदरम्यान घ्यावयाची काळजी आदी विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे.

# "अस्मिता खेलो इंडिया वूमेन्स लीग" सायकलिंग स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**विजेते खेळाडूंचा रोख ८० हजार रुपये बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव**

■ सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील-जगदिश भांबळ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




सायकलिंग असोसिएशन ने अहिल्यानगर जिल्ह्यात अस्मिता खेलो इंडिया सायकलिंग लीग स्पर्धेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्यासाठी संधी निर्माण केली आहे. उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे सायकलिंग या खेळातील स्पर्धकांना प्रोत्साहन मिळत आहे. या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदविला आहे. सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील. असे प्रतिपादन तोफखाना पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी केले आहे. अहिल्यानगर येथे पेमराज सारडा महाविद्यालयात राष्ट्रीय सायकलिंग महासंघ,खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर,ईनिफिटी सायकलिंग अँकॅडमी, जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने "अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग" व जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ तोफखाना पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य गिरीश पाखरे,शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मल थोरात, ऑलम्पिक अ.नगर असोशियशनचे सचिव शैलेश गवळी,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशाल गर्जे,सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव प्रा.संजय साठे, सायकलींग असो. अ.नगरचे अध्यक्ष साईनाथ थोरात,क्रीडा शिक्षक घनशाम सानप,कल्पेश भागवत, प्रा.संजय धोपावकर, प्रा.रावसाहेब बाबर,अविनाश काळे,योगिता वाणी,संभाजी मोहिते,विनायक भूतकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा.संजय साठे म्हणाले,जागतिक सायकल दिन हा सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग सायकलिंग स्पर्धेमुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे.तसेच या सायकलिंग स्पर्धेतून मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय खेळाडू घडतील.या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी मोठा प्रतिसाद दिला आहे.या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अहिल्यानगर पोलीस दल, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,शहर वाहतूक नियंत्रण शाखा,जिल्हा रुग्णालय,पेमराज सारडा महाविद्यालय आदींचे विशेष सहकार्य लाभले आहे. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना रोख ८० हजार रुपये रोख बक्षीस,प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून प्रा.संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात,रावसाहेब बाबर,शैलेश गवळी, कल्पेश भागवत, घनश्याम सानप, विशाल गर्जे,अविनाश काळे, विनायक भुतकर, प्रा.संजय धोपावकर, दिनेश भालेराव, योगिता वाणी आदींनी परिक्षण केले.

# वीज पडून बैलाचा मृत्यू झाला; शेतकऱ्याने एका बैलासह पत्नीलाच नांगराला जुंपले

सोलापूर : (स. गांवकरी)



शेतात वीज पडून एका बैलाचा मृत्यू झाला त्यामुळे शेतकऱ्याने एका बैलासह आपल्या पत्नीलाच नांगराला जुंपले आणि मशागत केली असल्याचा धक्कादायक प्रकार देवणी तालुक्यात घडला आहे या शेतकऱ्याला सरकारने तत्काळ बैल जोडी घेण्यासाठी आर्थिक मदत करावी अशी मागणी पुढे आली आहे. पत्नीला नांगरास का जुंपले आहे याचे कारण विचारले असता समोर विदारक सत्य, बाहेर आले जगाच्या पोशिंद्याचा न संपणारा संघर्ष दिसून आला. लातूर जिल्ह्यातील देवणी. येथे एका शेतकऱ्यावर पत्नीलाच नांगराला जुंपण्याची वेळ आली आहे. वीज कोसळून बैलाचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याने पत्नीलाच औताला जुंपलं. देवणीतील शेतकऱ्याच्या संघर्षाचा व्हिडीओ सोशल मीडियावर आज मोठ्या व्हायरल झाला आहे.

पेरणीसाठी पती-पत्नीच नांगर ओढत असल्याचं व्हिडीओत दिसत आहे. एकीकडे निसर्ग कोपला असताना, दुसरीकडे बैलच नसल्याने शेतकऱ्यावर आलेल्या या स्थितीने विदारक स्थिती समोर आणली आहे. लातूरच्या बोंबळी बुद्रुक येथील ही घटना आहे. लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातून मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. निसर्गाच्या प्रकोपाने शेतकऱ्याच्या आयुष्याची घडी विस्कटली आहे. शेतात वीज कोसळून बैलाचा मृत्यू झाल्यानंतर नवीन बैल खरेदी करण्याची आर्थिक ताकद नसल्याने एका शेतकऱ्याने चक्क आपल्या पत्नीलाच औताला

> देवणी तालुक्यातील घटनेमध्ये जी भयानकता घडली आहे याची माहिती असूनही आपत्ती व्यवस्थापनातून मदत मिळणं अपेक्षित होतं. तिथले तलाठी, तहसीलदार यांनी काय केले संबंधित शेतकऱ्याला तातडीने मदत करणं गरजेचं होतं. शेतकऱ्यावर अशा पद्धतीची वेळ का आली हे बघणं गरजेचं आहे. जर मदत मिळवून दिली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांच्या वर कारवाई होणं अभिप्रेत आहे,"
>
> **- काँग्रेस आमदार सतेज पाटील, कोल्हापूर**

जुंपून शेतीची मशागत सुरू केली आहे. देवणी तालुक्यातील बोंबळी बुद्रुक येथील काशिनाथ गायकवाड यांचा हा जीवघेणा संघर्ष सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे

व्हिडीओत शेतकरी महिला आपलं नाव हौसाबाई काशिना गायकवाड असल्याचं सांगत आहे. काय झालं असं विचारलं असता त्या सांगतात, मागच्या शुक्रवारी वीज पडून बैल मेला म्हणून जुंपलं. आता काय करणार? यावेळी त्या पंचनामा झाल्याची माहिती देतात. तसंच यावेळी त्या हात,पाय गळाले असून थरथरत असल्याचंही सांगतात.

राजू शेट्टी यांनी यावर संताप व्यक्त करत सरकारला लाज वाटली पाहिजे असं म्हटलं आहे. शेतकऱ्यावर ही वेळ सरकारमुळे आलेली आहे अशी टीका त्यांनी केली आहे. "लातूरमधल्या घटनेमुळे सरकारला लाज वाटली पाहिजे. दुसरा बैल घेण्याची ऐपत नसल्याने अर्धांगिनीला बैलासोबत जुंपले. शेतकऱ्यावर ही वेळ सरकारमुळे आलेली आहे. ट्रॅक्टरने पेरणी करायची म्हटलं तर डिझेल देत नाहीत. कृषीप्रधान महाराष्ट्र आपला अशा घटनांमुळे सरकारला लाज वाटली पाहिजे," असा संताप त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी लातूरमधल्या घटनेमध्ये आपत्ती व्यवस्थापनातून मदत मिळणं अपेक्षित होतं असं म्हटलं आहे. शेतकऱ्यावर अशा पद्धतीची वेळ का आली हे बघणं गरजेचं आहे असं सांगताना त्यांनी जर मदत मिळवून दिली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणं अभिप्रेत आहे असंही ते म्हणाले आहेत.

'या राज्यामध्ये शेतकऱ्यांची अवस्था बिकट झालेली आहे. दररोज सात ते आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## महागाईविरोधात महाविकास आघाडी आक्रमक

- पेट्रोल, डिझेल, गॅस दरवाढ व कांद्याला हमीभावासाठी कळवण तहसीलवर मोर्चा
- बुधवारी १० जून रोजी तहसीलदारांना निवेदन

कनाशी : (स. गांवकरी)

कळवण पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडरची दरवाढ, कांद्याला हमीभाव नसणे व वाढत्या महागाईच्या विरोधात कळवण तालुका महाविकास आघाडीच्या वतीने बुधवार, १० जून रोजी सकाळी ११.०० वाजता कळवण तहसील कार्यालय, कोल्हापूर फाटा येथे तहसीलदारांना निवेदन देण्यात येणार आहे. यावेळी महाविकास आघाडीची एकजूट याबाबत तालुका काँग्रेसचे अध्यक्ष के. के. गांगुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख, शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अंबादास जाधव, आदिवासी जिल्हाध्यक्ष राम चौरे व काँग्रेस महिला तालुकाध्यक्षा शितलताई महाजन यांनी माहिती दिली. सर्व महाविकास आघाडी पदाधिकारी व फ्रंटल संघटनांच्या अध्यक्षांनी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. या आंदोलनात माजी आमदार काशिनाथ बहीरम, सुमित्राताई बहीरम, महाराष्ट्र प्रदेश सचिव शैलेशदादा पवार (मा. जि. प. सदस्य), शहराध्यक्ष अतुल पगार, पर्यावरण जिल्हाध्यक्ष नाना देवरे, नाशिक जिल्हा सरचिटणीस योगेश गायकवाड, युवक तालुकाध्यक्ष मयूर बेनके, बबन कोल्हे, नरेंद्र भावसार, संतोष भोये, डॉ. महाजन, कॉम्रेड सक्रेटरी, कॉम्रेड पाडवी दादा, रामा पाटील, सुनील बस्ते, एकनाथ वाघ यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.


"केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे सर्वसामान्य जनता व शेतकरी मेटाकुटीला आला आहे. महागाईने कंबरडे मोडले आहे. कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे निवेदन देण्यात येत आहे," असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले. कळवण तालुक्यातील सर्व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कळवण तालुका महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रमुख मागण्या

१) पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसचे वाढलेले दर तात्काळ कमी करावेत.
२) कांद्याला किमान २५०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर करावा.
३) जीवनावश्यक वस्तूंची महागाई नियंत्रणात आणावी.
४) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा.

# संतांचे कृपादान हे कधीच संपणार नाही - ह.भ.प. मिसाळ

## बाळनाथ गडावर धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा उत्तराधिकारी समारंभ संपन्न



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

संतांचे चरणांचे दास झालो तर ते आपल्याला कोणत्याही प्रकारची आस शिल्लक ठेवणार नाही,आपण स्वतःला त्यांचे दास म्हणून घेतले पाहिजे. परमात्मा जगाचे हित करणारा आहे, तर जीवनाचे कल्याण करणारे संत असतात. संत कृपादान करतात ते असे दान देतात की ते कधीच संपणार नाही. तेव्हा प्रत्येकाने संतसंगती प्राप्त करण्यासाठी आपल्या जीवनाचे ध्येय ठेवावे. असे निरूपण हभप डॉ. विकास मिसाळ महाराज यांनी केले. बाळनाथ गड येथे आज दि.९ जून रोजी दुपारी संत चरणरज छगन महाराज यांचा उत्तराधिकारी म्हणून धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांचा दीक्षा समारंभ संपन्न झाला. यावेळी अहिल्यानगर सह महाराष्ट्रातील संत,महंत, वारकरी संप्रदाय, हभप मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आपल्या कीर्तनामधून मिसाळ महाराजांनी संत चरणरज छगन महाराज यांचा वारकरी संप्रदायातील प्रवास, बाळनाथ गडाची स्थापना ते उत्तराधिकारी नेमणुकीपर्यंत चा प्रवास किती खडतर होता, याचे विवेचन केले. त्यांचे प्रमाणे धर्मनाथ आदिनाथ मालुसरे यांनी देखील छगन महाराज यांच्याप्रमाणेच बाळनाथ गडाची गादी सांभाळावी.असे आवाहन त्यांनी केले. या समारंभास आ. अक्षय कर्डिले, प्रतिभाताई पाचपुते, हभप रेखाताई रिंगणे, वारकरी संप्रदायाचे प्रदेश उपाध्यक्ष माऊली गायकवाड, सर्वश्री हभप महादेव वांढेकर, घनश्याम शिंदे, मच्छिंद्र उरंगे, कैलास कोहोक, आदिनाथ शास्त्री,प्रकाश देवगिरे, बाळकृष्ण सोनवणे, दीपक महाराज, चितळे महाराज, नारायण गिन्हे, राजेश्वरानंद कुन्हे,महादेव कोरे, बाबासाहेब जाधव, अनिकेत लाड, श्यामसुंदर नाणेकर आदि संत मंडळी उपस्थित होते. हभप डॉ.मिसाळ यांच्या कीर्तनानंतर धर्मनाथ आदिनाथ यांचा छगन महाराजांचा फेटा बांधून, ग्रंथ पूजा करून सन्मान करण्यात आला. त्यांच्या उत्तराधिकारी पदवी प्रदान समारंभात सर्व उपस्थित भाविकांनी, संत मंडळींनी त्यांच्या डोक्यावर पुष्पवृष्टी करून आशीर्वाद दिला. या कार्यक्रमानंतर बाळेवाडी मधील ग्रामस्थांसह परिसरातील गावांमधून ग्रामस्थांनी उपस्थित भाविकांना धोंडे जेवण दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश वाघ यांनी केले, तर आभार प्रसाद देव महाराज यांनी मानले.

## पोलीस असल्याची बतावणी करून साडेतीन तोळे लांबविले

- दोघांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्ता परिसरात पोलीस असल्याची बतावणी करून दोन चोरट्यांनी वृध्दाकडील सुमारे साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने लुटल्याची घटना शनिवारी (६ जून) सायंकाळी घडली.

याप्रकरणी रविवारी (७ जून) तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणपतराव विष्णू पंदारे (वय ८४, रा. तुळजाभवानी मंदिरासमोर, अष्टविनायक कॉलनी, पाईपलाईन रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी गणपतराव पंदारे नेहमीप्रमाणे शनिवारी सायंकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडले होते. सायंकाळी साडेचारच्या सुमारास ते अष्टविनायक कॉलनीच्या कमानीजवळ पायी जात असताना त्यांच्या मागून दोन अनोळखी इसम आले. सदर इसमांनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगत, तुमच्या गळ्यातील चैन आणि हातातील अंगठ्या काढून द्या, असे सांगितले. समोरचे व्यक्ती पोलीस असल्याचा विश्वास बसल्याने पंदारे यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याची सोन्याची चैन आणि हातातील दोन तोळ्याच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून दिल्या.

यानंतर त्या इसमांनी त्यांच्या हातातील अंगठ्या पंदारे यांच्या हातात देत दिशाभूल केली. त्यानंतर गणेश बुक एजन्सीसमोर उभी केलेल्या दुचाकीवर बसून दोघेही भिस्तबाग चौकाच्या दिशेने पसार झाले. काही वेळानंतर त्या इसमांनी दिलेल्या अंगठ्या बनावट असल्याचे आणि त्यांना दिलेली चैन परत दिली नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे पंदारे यांच्या लक्षात आले.

यानंतर त्यांनी परिसरातील

## राजू पाटील शिंपाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त बिलोलीत वृक्षारोपण; विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव

बिलोली : (स. गांवकरी)

सामाजसेवक राजू पाटील शिंपाळकर यांचा वाढदिवस बिलोली आणि परिसरात केवळ एक कौतुक सोहळा म्हणून साजरा न करता, सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सनशाईन इंटरनॅशनल स्कूल आणि बिलोली पंचायत समिती परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश देण्यात आला.

सनशाईन इंटरनॅशनल स्कूल येथे शालेय प्रशासनाच्या वतीने राजू पाटील शिंपाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या, व लगेचच शाळेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर बिलोली पंचायत समिती परिसरातही वृक्षारोपण करण्यात आले. राजू पाटील हे दरवर्षी



आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून आवर्जून वृक्षारोपण करत असतात. हीच परंपरा कायम ठेवत, "पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एक तरी झाड लावून ते जगवावे," असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

नेहमी गोरगरिबांच्या अडीअडचणीला धावून जाणारे आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून राजू पाटील शिंपाळकर यांची ओळख आहे. त्यांच्या याच सामाजिक कार्याचा गौरव करत, त्यांच्या वाढदिवसानिमित्त यावेळी शाळेचे सचिव सत्यनारायण मेरगु प्राचार्य प्रेमा मेरगु, दिलीप पा. पांढरे, शिवसेना तालुका प्रमुख बाबाराव पा. रोकडे, दत्तात्र्य रायकंठवार,लक्ष्मण शेट्टीवार, आनंद गुडमलवार, यादव लोकडे ,बालाजी गेंदेवाड सर, सय्यद रियाज, माजिद सेठ कासराळीकर,चक्रधर पा. टेकाळे, वसंत जाधव,गोतम लंके, राजु बाभळीकर,मार्तंड जेठे,अनिल पा. नरवाडे, बालाजी नरहरे,देवराव शिंदे,परमेश्वर वाघमारे, देविदास कोंडलाडे, शिवानंद बुध्देवार,आनंदराव हिवराळे,सय्यद शेख,विजय पवार, ज्योतीबा गायकवाड, रवी पा. जाधव, शाम मजगे,यादवराव वाघमारे,हाणमंत बळके, नरवाडे व्यकट,बळीराम साळुंखे, कुरे साहेब, जाधव साहेब, सुर्यवंशी,धम्मदिप गावंडे यांच्यासह राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विविध संघटनांचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि मित्र परिवाराने प्रत्यक्ष भेटून व सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

## सकल माळी समाज ट्रस्टची बैठक संपन्न

- माळीवाडा पंचमंडळ देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी -किशोर डागवाले

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



प्रसाद कोके यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने माळी समाजासाठी सभासद नोंदणी सुरू करावी.या मागणीसाठी उपोषण केले होते. यावेळी सकल माळी समाजाने मध्यस्थी केली होती.व प्रसाद कोके यांनी उपोषण थांबवले.

श्री कोके यांची मागणी रास्त असल्याने सकल माळी समाजाने त्याचा मागणीचा पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे.शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थान चे सभासदत्व मिळावे. अशी माळी समाज बांधव मागणी करीत आहे.धार्मिक कार्याची आवड असल्याने व श्रीगणेशा ची सेवा करण्याची संधी मिळावी.ही प्रत्येक समाजबांधवाची मनोभावे इच्छा आहे. माळीवाडा पंचमंडळ देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी.अशी मागणी सकल माळी समाज ट्रस्ट च्या बैठकीत ठरले असल्याचे प्रतिपादन सकल माळी समाज ट्रस्ट चे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

माळीवाडा येथील महालक्ष्मी मंदिरात माळीवाडा पंच मंडळ ट्रस्ट श्री विशाल गणेश देवस्थान ने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी.या मागणीसाठी सकल माळी समाज ट्रस्ट ची बैठक संपन्न झाली.या बैठकीत सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे,विनोद पुंड,कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे,प्रकाश इवळे, अमोल भांबरकर,अखिल भारतीय समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, साहेबराव विधाते,नारायण इवळे,सुधाकर कानडे, विनायकराव कोके,राजेंद्र ताठे,प्रकाश इवळे,संजय कानडे, गणेश कोल्हे,प्रसाद कोके,जालिंदर खंदारे,मनोज भुजबळ,अशोक हजारे,रामदास खंदारे, सचिन एकाडे,संजय ताजणे, प्रकाश रासकर,भास्कर खंदारे, अर्जुन गोंधळे, अशोक हिंगे, कल्याणी गाडळकर, रेणुका पुंड आदी उपस्थित होते. विनायकराव कोके म्हणाले,हा लढा मी वैयक्तिक स्वार्थासाठी उभारला नसून समाज हितासाठी सभासद नोंदणी सुरू करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे.माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने मला विश्वस्त करून माझ्या घरातील सभासद नोंदणी करण्याचे आमिष दिले होते. परंतु माळी समाज घटकांना समाविष्ट करावे.ही मागणी मी केलेली आहे. तसेच जे सभासद मयत झाले आहे. त्यांच्या वारसांना देखील सभासद करुन घ्यावे.प्रकाश इवळे म्हणाले,कोके बंधूंनी माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ने सभासद नोंदणी सुरु करावी.या मागणीसाठी लढा उभारला आहे.या लढ्याला माळी समाजाने पाठिंबा द्यावा.कोके यांनी निस्वार्थपणे माळी समाजाचे बांधव व भगिनींसाठी सभासद नोंदणी करून घ्यावी. अशी मागणी केली आहे. ही मागणी रास्त असल्याने समाज त्यांच्यासोबत आहे. डॉ.रणजीत सत्रे म्हणाले, ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थाने सर्वांचे आराध्य दैवत आहेत.बालिकाश्रम रोड सुडके मळा, जाधव मळा,बोरुडे मळा,ताठे मळा या परिसरातील समाज बांधवांना माळीवाडा पंच मंडळ देवस्थानचे सभासद होण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.व धार्मिक कार्यात सहभागी करून घ्यावे. बाळासाहेब भुजबळ म्हणाले,कोके पाटील यांनी उभारलेला लढा हा वैयक्तिक नसून तो समाजासाठी असल्याने समाजाने सामूहिक निर्णय घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे.तसेच माळी समाजासाठी सभासद नोंदणी खुली करावी.या मागणीसाठी सकल माळी समाजाचे शिष्टमंडळ प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे. यावेळी सचिन एकाडे,राजेंद्र पडोळे,अशोक हिंगे,राजेंद्र ताठे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आभार प्रसाद कोके यांनी मानले.

## आता निवडणुकीपूर्वी त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कारभार पाहण्यासाठी आता बँकेवर प्रशासकाऐवजी प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्त करण्यात आले आहे. यापूर्वी बँकेवर प्रशासक (प्राधिकृत अधिकारी) नियुक्त करण्यात आला होता. परंतु आता विभागीय सहनिबंधक संभाजी निकम (नाशिक) यांनी त्यामध्ये बदल करत बँकेवर प्राधिकृत अधिकारी मंडळ (प्रशासकीय मंडळ) नियुक्त केले आहे. तीन सदस्यीय प्रशासकीय मंडळाने पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. विभागीय सहनिबंधकांनी यासंदर्भातील आदेशात कोणतेही स्पष्टीकरण न देता हा बदल केला आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची मुदत गेल्या फेब्रुवारी २०२६ मध्ये संपुष्टात आली. संचालक मंडळाची निवडणूक जाहीर होण्याची प्रतीक्षा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. सुरुवातीला राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक व त्यानंतर आता विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रतीक्षा होती. आता विधान परिषदेच्या अहिल्यानगर मतदारसंघातील निवडणूक बिनविरोध झाली असली तरी निवडणुकीची आचारसंहिता २२ जूनपर्यंत आहे. संचालक मंडळाचे अस्तित्व संपुष्टात आल्याने विभागीय सहनिबंधक निकम यांनी बँकेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक गौतम निकाळजे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून महिन्यापूर्वी नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यानुसार निकाळजे यांनी त्याच दिवशी तातडीने पदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यानंतर विभागीय सहनिबंधकांनी या आदेशामध्ये बदल करत प्राधिकृत अधिकाऱ्याऐवजी बँकेच्या कारभारावर तीन सदस्य प्रशासकीय मंडळामार्फत नियंत्रण ठेवले जाईल, असे आदेशात स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### २६ जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा 'यलो अलर्ट


अहिल्यानगर (स. गांवकरी) : एका दिवसाच्या विश्रांतीनंतर अखेर मान्सूनने दक्षिण महाराष्ट्र पूर्णपणे व्यापला आहे. सोमवारपासून दक्षिण महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यामुळे बळीराजासह नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. हवामान खात्याने राज्यातील २६ जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. अनेक भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याशिवाय कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत तुरळक ठिकाणी जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या या आगमनामुळे कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील किनारपट्टीच्या भागात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सून सध्या तळकोकणातील रत्नागिरी आणि हरणाईपर्यंत पोहोचला आहे. तर दक्षिण मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये मान्सूनने हजेरी लावली आहे. मान्सूनने कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या आणखी काही भागांमध्येही प्रवेश केला आहे. मान्सूनची गती संथ असली तरीही येत्या २ ते ३ दिवसांत तो महाराष्ट्राच्या आणखी काही भागांमध्ये प्रगती करेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच, येत्या २ ते ३ दिवसांत ईशान्येकडील राज्यांमध्येही मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.



### जुन्नरच्या सिद्धीची थेट अमेरीकेत गगनभरारी

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील सिद्धी अनंत हाडवळे हिने अवघ्या २०व्या वर्षी अमेरिकेत व्यवसायिक वैमानिक कमर्शियल पायलट प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करत अंतिम पायलट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे राजुरी गावासह संपूर्ण जुन्नर तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिचे कौतुक केले जात आहे. लहानपणापासूनच आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सिद्धीने आपल्या जिद्द ,मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून जागतिक स्तरावरील करिअरची वाट निवडणे सोपे नव्हते. मात्र ,अनेक अडचणी आणि आव्हानांवर मात करत तिने आपले ध्येय साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. वैमानिक होण्यासाठी आवश्यक असलेले उच्च दर्जाचे प्रशिक्षण घेण्यासाठी सिद्धी अमेरिकेत गेली. नवीन देश, वेगळी संस्कृती आणि कठोर प्रशिक्षण प्रक्रियेला सामोरे जात तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. उड्डानाचे आवश्यक तास पूर्ण करत तिने सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार केल्या आणि अखेर कमर्शियल पायलट होण्याचे स्वप्न साकार केले. सिद्धीच्या या यशामुळे जुन्नर तालुक्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील तरुण-तरुणींना मोठी स्वप्ने पहाण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेण्याची प्रेरणा तिच्या यशोगाथेतून मिळत आहे. शिक्षण ,चिकाटी आणि समर्पणाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. आज सिद्धी हाडवळेच्या यशाचा आनंद केवळ तिच्या कुटुंबापुरता मर्यादित नसून संपूर्ण जुन्नर तालुका आणि महाराष्ट्रासाठी तो अभिमानाचा क्षण ठरला आहे . तिची ही प्रेरणादायी भरारी अनेक युवक -युवतींना त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करण्याची प्रेरणा देणारी ठरत आहे.

### मांजरीने खाल्ला अंगठीचा धोंडा; घरच्यांची धावपळ



खोडद (स. गांवकरी) : सध्या अधिकमास सुरु आहे आणि या अधिकमासात जावयाचा मोठा मान असतो. प्रत्येक सासरा आपल्या जावयाला वाण देताना सोन्याच्या स्वरूपात काहीतरी वस्तू देत असतो. मात्र, जावयासाठी केलेला धोंडा मांजरीने खाल्ल्याचा प्रकार समोर आला आहे. धोंड्याच्या महिन्यासाठी आलेल्या जावयाला सरप्राईज देण्यासाठी अंगठी धोंड्यात ठेवून तो इतर धोंड्यांसोबत ठेवला. मात्र, स्वयंपाकानंतर आवराआवरी सुरू असताना घरात आलेल्या मांजरीने नेमका तोच धोंडा खाऊन टाकला, त्यामुळे घरच्यांची धांदळ उडाली.

# शिवजन्मभूमी जुन्नरच्या विकासाला नवी चालना

खोडद : (स. गांवकरी)





जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक शिवजन्मभूमी परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. इतिहासकालीन जुन्नर तालुक्यात प्रत्येकी तीन कोटी रुपये खर्चाच्या सहा भव्य प्रवेशद्वारांचे बांधकाम करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून मंजूर करून घेण्यात आला आहे.शिवनेरी किल्ल्याच्या परिसरात आकर्षक प्रवेशद्वारे उभारण्यासह पर्यटनाला चालना देणाऱ्या 'बिबट सफारी' प्रकल्पालाही मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्याच्या पर्यटन विकासाला नवी गती मिळणार आहे. पुढील महिन्यात या प्रकल्पाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आमदार शरद सोनवणे यांनी दिली.

शिवनेरी गडाच्या पायथ्याशी जुन्नर शहरातील पाच रस्ता चौकात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्यात ते बोलत होते. शिवजन्मभूमी म्हणून ओळख असलेल्या जुन्नरमध्ये दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक आणि शिवप्रेमी भेट देतात. त्यांच्या सोयीसाठी पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रवेशद्वारे, सुशोभीकरण आणि पर्यटनविषयक सुविधा उभारल्यामुळे परिसराचे आकर्षण वाढणार असून स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेची घोषणा १ मे १९६० रोजी किल्ले शिवनेरीवर करण्यात आली होती. त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ यापुढे प्रत्येक वर्षी १ मे महाराष्ट्र दिन जुन्नरमध्ये भव्य स्वरूपात साजरा केला जाणार असल्याचे सांगत आमदार शरद सोनवणे यांनी शिवजन्मभूमीचे पावित्र्य जपण्याचे आवाहन केले. यावेळी भाजप नेत्या आशा बुचके, हभप संग्राम बापू भंडारे, नगराध्यक्ष सुजाता काजळे,नगरसेवक अलका फुलपगार, बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण, उपसभापती अमित ढोले, मयुर महाबरे, विक्रम परदेशी, अंजली शिंदे, रुपाली परदेशी, निलेश गुंजाळ,बाळासाहेब गाजरे, अनुजा पातूरकर, दर्शन फुलपगार, सुवर्णा जाधव, राजश्री खोंड,अनिल रोकडे, भाऊ कुंभार, नंदकुमार तांबोळी,समीर पुरवंत,सुरज नानावटी,विकी गोसावी आदींसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व शिवभक्त उपस्थित होते. दरम्यान, शिवव्रत सोहळ्याचे आयोजन उत्साहात पार पडले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, ऐतिहासिक सादरीकरणे आणि शिवचरित्रावर आधारित उपक्रमांमुळे नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला. यावेळी जुन्नरमधील ५५ कलाकारांनी शिवप्रताप सोहळा हे ऐतिहासिक नाटक सादर केले.यावेळी शिवनेरी व जुन्नरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.